नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

मे १९६०

युगवाणी

या अंकातील लेखक व कवि

कै. श्री. कृ. कोल्हटकर
पु. य. देशपांडे
भानु चौधरी
श्याम चौधरी
राजा मुकुंद
रामदास सेलूकर
ब. गो. मालोदे
प्रा. माणिक के. बैतुले
ना. रा. शेंडे
स. शं. देसाई
द. भि. कुळकर्णी

मूल्य ८ आणे

(मध्यप्रदेश शिक्षणविभागाकडून वाचनालयांकरिता मान्य झालेले)

युगवाणी

संपादक-मंडळ
संपादक : पु. य. देशपांडे
सदस्य : गो. रा. दोडके
प्र. वा. ऊर्ध्वरेषे
पुरुषोत्तम दिवाकर ढवळे

फे१९६०
प्रा

* *

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

संपादक :
पुरुषोत्तम यशवंत देशपांडे

युगवाणी

वर्ष १५] अंक २

कला : जीवन : समीक्षा

मे १९६०

संपादकीय

महाराष्ट्राचा नवा अवतार

दि. १ मे, १९६० हा दिवस महाराष्ट्राच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिला जाईल. या दिवशी समग्र मराठी भापी लोक 'महाराष्ट्र' या नावाने संबोधिल्या जाणाऱ्या एकाच राज्याच्या छत्राखाली भारतीय संसदेच्या कायद्यानुसार आणले जातील. ही घटना ऐतिहासिक महत्त्वाची आहे, ही गोष्ट कोणालाहि नाकारता येणार नाही.

भारतीय इतिहासात महाराष्ट्रीयांनी केलेली कामगिरी अनन्यसाधारण अशी आहे. याची आंतरिक जाणीव ब्रिटिश साम्राज्यवाद्यांना पुरेपूर होती. म्हणून भारतावरील आपल्या साम्राज्यसत्तेला स्थैर्य लाभावे या हेतूने ब्रिटिशांनी जी धोरणे आखली त्यात महाराष्ट्रीयांच्या ऐतिहासिक कर्तृत्वाचे विडंबन, हा एक महत्त्वाचा भाग होता. भारताचे इस्लामीकरण करण्यासाठी मुसलमान राज्यकर्त्यांनी केलेल्या भगीरथ प्रयत्नांचा बिमोड करणाऱ्या छत्रपति शिवाजी महाराजांची 'डोंगरी उंदीर' 'लुटारु' इत्यादि नीच विशेषणें लावून हेटाळणी करणे, महाराष्ट्रीयांना व पर्यायाने सनातन भारतीय संस्कृतीच्यां सर्व अभिमान्यांना रानटी, प्रतिगामी, दलित जनहितविरोधी व निर्घृण शोषक, अशी विशेषणे लावून भारतीय संस्कृतीची पद्धतशीर बदनामी करगे, आणि भारतीय समाजनेत्यांचा पदोपदी तेजोभंग होईल असे वातावरण या देशात व समग्र आधुनिक जगात

अनुक्रमणिका

निर्माण करणे, इत्यादि स्वरूपाच्या ज्या काळ्या कारवाया ब्रिटिश व पाश्चात्य सत्ताधिशांनी केल्या, त्याचा परिणाम आधुनिक भारतीय सुशिक्षितावर एवढ्या मोठ्या प्रमाणात झाला की, महाराष्ट्रीय द्वेषाचे बीज, लोकमान्य टिळकांच्या स्वर्गवासानंतर, स्वराज्यासाठी बद्धपरिकर झालेल्या कांग्रेसच्या परिसरातहि उगवू लागले. 'लोकमान्य–विरुद्ध–महात्मा गांधी' असा अर्थशून्य व बिनबुडाचा वाद निर्माण करून लोकमान्यानुगामी महाराष्ट्राची पद्धतशीर पिच्छेहाट आधुनिक भारतीय राजकारणात करण्यात येऊ लागली. महाराष्ट्रातील काही पुढारी या डावाला बळी पडल्यामुळे महाराष्ट्राच्या तेजोभंगाला सीमा उरली नाही.

स्वराज्यप्राप्तीनंतर महाराष्ट्रीयांच्या विरुद्ध बळावलेल्या या आकसाला अत्यंत हीन स्वरूप प्राप्त झाले. राज्य पुनर्घटना समितीने महाराष्ट्राविषयी जे अनुदार धोरण स्वीकारले त्यांत स्वतंत्र भारताच्या आधुनिक राज्यकर्त्यांच्या वृत्तीचेच प्रतिबिंब उमटले होते; आणि पुढे श्री. चिंतामणराव देशमुखांच्या राजीनाम्यामुळे जी प्रतिक्रिया आकारास आली ती इतकी भयानक व भेसुर होती की ती जर तशीच कायम राहिली असती तर त्यामुळे महाराष्ट्राचे व पर्यायाने समग्र भारताचे राजकीय व सांस्कृतिक भवितव्य प्रदीर्घ कालापर्यंत संकटात लोटले गेले असते.

पण सुदैवाने हे संकट आता पूर्णपणे संपुष्टात आले आहे. 'पांच हजार वर्षे पर्यंत झगडले तरी मुंबई महाराष्ट्राला मिळणे शक्य नाही,'--'मुंबइचे द्विभाषिक राज्य हे कधीहि भंगणार नाही'—अशा आशयाच्या आरोळ्या ठोकणारे कांग्रेस-पक्षाचे महनीय नेते आता पार विरमले आहेत. त्यांना आपण केलेल्या घोडचुकांची पुरेशी जाणीव झालेली आहे. ही महाराष्ट्राच्या व भारताच्या भवितव्याच्या दृष्टीने अनन्यसाधारण महत्त्वाची घटना आहे

एकछत्री राज्य

आता समग्र मराठी भाषीयांचे एकछत्री राज्य, भारतीय संघराज्याचा एक अविभाज्य व सन्माननीय घटक म्हणून आकारास आले आहे. बेळगाव, कारवार व मध्यप्रदेशात लोटण्यात आलेले काही मराठी विभाग अद्याप या नव्या राज्यात समाविष्ट झालेले नसले तरी तेवढ्याचेच निमित्त करून महाराष्ट्राच्या नव्या राज्याला अपशकून करणाऱ्या वृत्तीच्या आहारी जाणे, हा एक स्वजनद्रोहच होईल. त्याचप्रमाणे विदर्भासाठी स्वतंत्र राज्याची मागणी करणाऱ्यांना अपयश पत्करावे लागले आणि नागपूर–करारालाहि कायद्याचे स्वरूप नव्या विधेयकात देण्यात आले नाही म्हणून हिरमुसून बसलेल्या वैदर्भीयांना आमची अशी कळकळीची विनंती आहे की, भारतीय संस्कृतीचा एक अविभाज्य भाग म्हणून

महाराष्ट्राचा हा जो नवा अवतार उदयाला आला आहे, त्याचे ऐतिहासिक महत्त्व ओळखून त्यांनी आपल्या सर्व प्रादेशिक व संकुचित भावनांना कायमचा आवर घालावा. 'विदर्भ-विरुद्ध-महाराष्ट्र' असा वाद यापुढे कायम ठेवणे, हा एक प्रकारचा सांस्कृतिक अधःपातच ठरेल, हे त्यांनी विदर्भाच्या अंतिम हितदृष्टीनेच लक्षात घेणे आवश्यक झाले आहे. समग्र मराठी भाषिकांच्या एकछत्री राज्याला कांही मराठी भाषी लोकांनीच नित्य नख लावीत बसण्याचा उद्योग चालू ठेवणे, हे एक तत्त्वभ्रष्टतेचे व सांस्कृतिक अधःपाताचेच लक्षण ठरेल.

नव्या अवताराचे रहस्य

मुंबई, विदर्भ, मराठवाड्यासहित समग्र पुरातनकालीन महाराष्ट्र, अत्यंत विपरीत परिस्थितीला धैर्याने तोंड देऊन, एकछत्री नवराज्यरूपाने प्रस्थापित होणे, या घटनेत महाराष्ट्राच्या नव्या अवताराचे फार मोठे रहस्य साठले आहे, असे आम्हाला वाटते. आजकाल राजकारणाला व अर्थकारणाला अमाप महत्त्व देत बसण्याचा जो पायंडा पडू पाहत आहे तो समग्र सनातन भारतीय संस्कृतीला व तिच्या नव्या तेजस्वी पुनरुत्थानाला किती घातक आहे, याची मोठमोठ्यांना देखील असावी तशी जाणीव दिसून येत नाही. भारताचा स्वातंत्र्यसंग्राम हा केवळ राजकीय व आर्थिक अडचणीचे निवारण करण्यासाठीच आकारास आला होता, असा सिद्धांत प्रतिपादणारे धादांत खोटे बोलणारे आहेत. त्यांना भारतीय अस्मितेची यत्किंचितहि जाणीव आहे, असे दिसून येत नाही. राजा राममोहन राय यांच्या कालापासून आधुनिक भारताच्या पुनरुत्थानास जो प्रारंभ झाला तो वैदिक औपनिषदिक तत्त्वज्ञानानेच उत्स्फूर्त झाला होता. त्यानंतर ब्राह्मोसमाज आर्यसमाज, प्रार्थनासमाज, श्रीरामकृष्णआश्रम, श्रीअरविंद घोष-योगाश्रम, इत्यादि स्वरूपाच्या ज्या चळवळी झाल्या त्या सर्वांच्या मुळाशी वेदप्रणीत औपनिषदिक तत्त्वज्ञानांतर्गत विश्वदर्शनाची प्रेरणाच प्रामुख्याने होती, हे ऐतिहासिक सत्य आहे.

'इंडियन नॅशनल कांग्रेस' ही संस्था पाश्चात्य उदारमताने आरंभी जरी प्रेरित झालेली होती, तरी तिच्यात गीतोपनिषदांच्या विश्वदृष्टीची प्राणप्रतिष्ठा संचारित करण्याची महनीय कामगिरी लोकमान्य टिळक, श्री. अरविंद घोष व महात्मा गांधी यांनी केली, हेहि ऐतिहासिक सत्य आहे. पाश्चात्य उदारमतवाद हा कितीहि प्रगत मानण्यात येत असला, तरी त्याचे मंत्र-तंत्र-यंत्र हे आधुनिक जडवादी विज्ञानाच्या प्रभावामुळेच आकारास आलेले होते. या वादाच्या मुळाशी धुगधुगत असलेला विशाल मानवतेचा गाभा स्वीकृत करून गीतोपनिष-

प्रणीत भव्य विश्वदर्शनात तो जिरवून टाकण्याचे महान् सांस्कृतिक कार्य, टिळक-अरविंद-गांधी या त्रिमूर्तींनी केले.

भारतावर वेदोपनिषत्प्रणीत भव्योदात्त विश्वदृष्टीचा प्रभाव जिवंत व व जाज्वल्य स्वरूपात कायम नसता तर भारतीय जनतेला टिळक-अरविंद-गांधी-पुनीत अशा काँग्रेसच्या ध्वजाखाली आपली सांस्कृतिक एकात्मता प्रकट करण्याचे सामर्थ्य कदापीहि प्राप्त झाले नसते. या सांस्कृतिक एकात्मतेच्या अभावी समग्र भारतावर प्रभाव पाडू शकणारे एकच एक राष्ट्रीय नेतृत्व कदापीहि आकारास आले नसते. 'भगवत्गीता-प्रणीत कर्मयोगाचे खड्ग हाती घेऊनच टिळकांनी लोकमान्यता प्राप्त करून घेतली. गीताप्रणीत योगविद्या नजरेसमोर ठेवूनच स्वधर्म व स्वराज्य या शब्दात, आधुनिक काळाला आवश्यक असा, सनातनवैदिक प्राण अरविंदांनी भरला आणि गीताप्रणीत अनासक्ति योगाचे तपःपुनीत शस्त्र हाती घेऊनच गांधीजींनी असहकार व सत्याग्रह ही आत्मिक शक्तीने भारलेली सामुदायिक प्रतिकारास्त्रे आकारास आणली. या त्रिमूर्तींनी भारतीय स्वातंत्र्याच्या विराट् जन-आन्दोलनाला वेदोपनिषदप्रणीत सांस्कृतिक एकात्मतेची जोड दिली नसती, तर आधुनिक भारत स्वातंत्र्यासाठी संग्राम करण्यास कदापीहि समर्थ झाला नसता.

भारतीय स्वातंत्र्याचे विराट् जन-आन्दोलन हे मूलतः वेदोपनिषत्प्रणीत सांस्कृतिक पुनरुत्थानाचेच आन्दोलन होते. पण दुर्दैवाने स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ज्या नेत्यांच्या हाती राज्यकारभाराची सूत्रे आली, त्यांना या सत्याचा विसर पडला पाश्चात्य जगापुढे आपल्या पुढारलेपणाचे प्रदर्शन करण्याची प्रवृत्ति बळावली. जे मुळात अध्यात्मस्फुरित सांस्कृतिक पुनरुत्थान होते ते स्वातंत्र्योत्तर काळात 'निधर्मी' व जडवादी बनू लागले. काँग्रेसने सन १९२०-२१ सालापासूनच गांधीजींच्या नेतृत्वाखाली, स्वराज्योत्तर कालातील राज्यघटना ही भाषिक राज्यांच्या संयुक्त संघावरच अधिष्ठित केली जाईल, असे निःसंदिग्धपणे घोषित केले होते. त्यावेळी गांधीजींसहित सर्व राष्ट्रीय नेत्यांना हे माहित होते की, भारतातील अनेक भाषा विकसित झाल्या आहेत. ह्या भाषा भिन्न भिन्न भासल्या तरी त्यांच्या माध्यमातून जे विचार व ज्या भावना शेकडो वर्षांपासून प्रवाहित झालेल्या होत्या त्या सर्व वेदोपनिषत्प्रणीत विश्वदर्शनाशी व विश्वात्मक भारतीय संस्कृतीशी सुसंगत अशाच होत्या. या प्रादेशिक भाषांच्या विकासामुळे भारताची एकात्मता भंग न पावता ती अधिक समृद्ध व जनताभिमुखी झाली होती. किंबहुना, राजकीय दृष्टया सदा दुभंगलेल्या भारताची सांस्कृतिक एकात्मता कायम ठेवण्याचे महनीय कार्य कोणी केले असेल तर ते या प्रादेशिक भाषातील साहित्यानेच केले, हे ऐतिहासिक सत्य आहे.

म्हणून आधुनिक भारताचे पुनरुत्थान हे सांस्कृतिक एकात्मतेच्या पार्श्वभूमीवरच केले जाऊ शकते, याची पुरेपूर जाणीव गांधीजींच्या काळापर्यंत अस्तित्वात होती. पण गांधीजींच्या प्रयाणानंतर भारतीय नेतृत्वाच्या मानगुटीला 'सेक्युलॅरिझम'चे भूत येऊन बसले. धर्म, संस्कृति, स्वधर्म, स्वराज्य हे शब्द अर्थशून्य झाले, आणि पाश्चात्य 'डेमोक्रॅटिक कॉन्स्टिटयूशनॅलिझम्' 'सेक्युलॅरिझम्' निर्नैतिक आर्थिक संयोजन आणि केवळ उपयुक्ततावादी स्वार्थीव लोकाचार, यांना अमाप पीक आले. भारतीय जनतेच्या धार्मिक व सांस्कृतिक निष्ठांची अवहेलना करण्यात आली आणि पाश्चात्य विज्ञान व निर्नैतिक उपयुक्ततावाद या नव्या देवता दिल्लीत सिंहासनस्थ होऊन बसल्या. ज्या शिडीवर चढून दिल्लीचे सिंहासन प्राप्त केले ती शिडी मोडून टाकण्याचा अट्टाहास सुरू झाला.

जी भाषिक राज्ये भावी भारतीय स्वराज्याला पायाभूत मानण्यात आली होती, त्यांची मागणी करणारे 'लिंग्विस्टिक फॅनॅटिक्स' म्हणून हिणविण्यात येऊ लागले व त्यांची मागणी ही भारतीय ऐक्याला विघातक म्हणून देशद्रोही ठरविण्यात येऊ लागली. भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील सर्व सांस्कृतिक व नैतिक मूल्यांना मूठमाती देण्यात आली. दैवी संपत्तीची परलोकात हकालपट्टी करण्यात आली आणि इहलोकात 'स्वर्ग' आणण्यासाठी आसुरी संपत्तीचा नंगा नाच सुरू झाला!

या अशा अत्यंत विपरीत परिस्थितीला अतुलनीय व असामान्य धैर्याने तोंड देऊन महाराष्ट्रीय जनतेने दिल्लीतील आसुरी सत्तासंपत्तिपिसाटांना असा हादरा दिला की, त्याची नोंद इतिहासात सुवर्णाक्षरांनीच करावी लागेल. म्हणून महाराष्ट्र राज्याची निर्मिति म्हणजे आधुनिक काळातील 'महाराष्ट्राचा नवा अवतार'च होय, असे सार्थतेने म्हणता येते.

हे पूर्वीच झाले असते तर–

भारतीय संस्कृतीच्या एकात्मतेचे निसर्गसिद्ध व इतिहाससिद्ध असे अविभाज्य घटक म्हणजे भारतातील भिन्नभिन्न भाषिक जनसमूह हेच होत. ही गोष्ट कांग्रेसने १९२०–२१ सालीच ओळखून तिला आपल्या घटनेत तत्त्वतः मान्यताहि दिली होती. या मान्यतेशी इमान राखून, भारताची नवी राज्यघटना बनवितानाच भाषिक राज्यांना सांघिक राज्याचे घटक मानण्यात आले असते, तर गेल्या दहा–बारा वर्षात भाषावादाला जे भीषण स्वरूप आले ते टळले असते, भारताची एकात्मता संस्कृतिनिष्ठ अशा विशुद्ध राजकीय अधिष्ठानावर आरूढ झाली असती आणि भाषा–भाषांतील यादवीचे विष भारतीय समाज-

जीवनात कालविण्याचे महापातक राज्यकर्त्यांकडून घडले नसते. पण दुर्दैवाने जे घडू नये ते घडले.

पण आता जे झाले-गेले-पार-पडले त्याचा हाडे चघळीत बसण्यात काही अर्थ उरलेला नाही. उलट, उशिरा का होईना, जे घडावयास पाहिजे होते ते घडले, याचा आनंद मानून या आनंदाच्या सागरात जुने सर्व किल्मिष पार बुडवून टाकले पाहिजे.

महाराष्ट्राची नवी जबाबदारी

महाराष्ट्राचे नवे राज्य प्रस्थापित झाल्यामुळे महाराष्ट्रीय जनतेवर फार मोठी जबाबदारी येऊन पडली आहे. महाराष्ट्रीय अस्मितेची भारतभाग्योदयकारी तेजस्विता प्रकट करण्याची संधि महाराष्ट्रीय जनतेला आता प्राप्त झाली आहे. ज्या सांस्कृतिक पार्श्वभूमीवर महाराष्ट्र-राज्यासाठी जनतेने लढा दिला ती सांस्कृतिक भूमिका अधिकाधिक उन्नत करून, समग्र भारताला भूषणभूत होणारे असे आदर्श राज्य आकारास आणण्यासाठी सर्व शक्ति पणाला लावून आता झटले पाहिजे. यादवीचा शाप श्रीकृष्णाच्या कालापासूनच भारताला व विशेषतः महाराष्ट्राला भोवत आहे. 'महाराष्ट्राचा नवा अवतार' ही आमची वाणी सार्थ ठरावयाची असेल, तर प्रामाणिक मतभेद बाळगूनहि, यादवीचे भूत आपल्याला प्रथमतःच गाडून टाकावे लागेल. सांस्कृतिक व नैतिक मूल्यांची पायमल्ली न करता, उलट त्यांच्या अधिष्ठानावरच, आदर्श आधुनिक राज्य कसे निर्माण करता येते, याचे एक प्रात्यक्षिक भारताला व जगाला दाखविण्याची संधि महाराष्ट्राला शिवरायाच्या पुण्याईमुळे शिवजयंतीच्या सुमुहूर्तावरच प्राप्त झालेली आहे. शिवजयंतीचा महोत्सव आणि नव्या महाराष्ट्रराज्य-स्थापनेचा महोत्सव हे दोन्ही एकात एक मिसळून जावेत, हा एक फार मोठा शुभ शकुन आहे. महाराष्ट्रीय जनता आपल्या उज्ज्वल सांस्कृतिक परंपरेस आणि सनातन व विश्वात्मक भारतीय सांस्कृतिक परंपरेस जागून, आपले व देशाचे भव्योदात्त भवितव्य घडवून आणण्यास प्रतिज्ञापूर्वक बद्धपरिकर होईल, अशी आम्ही आशा करतो.

—पु. य. देशपांडे

अनुक्रमणिका

क वि ता

महाराष्ट्र-गीत

कै. श्री. कृ. कोल्हटकर

बहु असोत सुंदर संपन्न की महा
प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा!
गगनभेदि गिरिविण अणु नच जिथे उणें
आकांक्षांपुढति जिथे गगन ठेंगणें
अटकेवरि जेथील तुरंगि जल पिणें
तेथ अडे काय जलाशयनदांविणें?
पौरुषासि अटक गमे जेथ दुःसहा!
प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा! १

प्रासाद कशास जेथ हृदयमंदिरें
सद्भावांचींच भव्य दिव्य आगरें!
रत्नां वा मौक्तिकांहि मूल्य मुळि नुरे
रमणीची कूस जिथे नृमणिखनि ठरे
शुद्ध तिचें शीलहि उजळवि गृहा गृहा
प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा! २

नग्न खड्ग करिं, उघडे बघुनि मावळे
चतुरंग चमूचेंहि शौर्य मावळे!
दौडत चहुंकडुनि जवें स्वार जेथले
भासत शतगुणित जरी असति एकले!
यन्नामा परिसुनि रिपु शमितबल अहा!
प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा! ३

अनुक्रमणिका

विक्रम, वैराग्य एक जागिं नांदती
जरिपटका भगवा झेंडाहि डोलती
धर्म राजकारण समवेत चालती
शक्ति–युक्ति एकवटुनि कार्य साधिती !
पसरे यत्कीर्ति अशी विस्मयावहा !
प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा ! ४

गीत मराठ्यांचें श्रवणीं मुखीं असो
स्फूर्ति, दीप्ति, धृतिहि देत अंतरीं ठसो !
वचनिं लेखनींहि मराठी गिरा दिसो
सतत महाराष्ट्रधर्ममर्म मनिं वसो !
देह पडो तत्कारणिं ही असे स्पृहा !
प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा ! ५

* *

जीवन हे चिद्‌विलास

पु. य. देशपांडे

पानांवर पिंपळाच्या
चंद्रबिंबांची आरास
लखलखत्या ज्योतींचा
लसलशीत उल्हास ॥१॥

जीवाजीवांच्या डोळ्यांत
ज्योतीज्योतींची आरास
चिर–तरल स्वप्नांचे
गूढ मधुरसे भास ॥२॥

लवलवती पापण्या
उघडझाप पंखांची
फुलाफुलात पाखरू
आरास रम्य रंगांची ॥३॥

मनामनात कामना
कणाकणात उल्हास
कल्पतरू चिदाकाशी
जीवन हे चिद्‌विलास ॥४॥

* *

अनुक्रमणिका

कोण अभावित ?

भानु चौवरी

कोण अभावित येउनि गेले
अशांत या जीवनात माझ्या
आणि अकारण उजळुन गेले
सांदिकोपरे मनिचे माझ्या ?

आजवरी जे कधि न चिन्तिले
चिन्तुनीहि जे कधि न लक्षिले
रसायनी त्या शराग्र बुडवुनि
मलाच कोणी लक्ष्य बनविले ?

कोण अभावित येउनि गेले
अलगद टाकित तांबुस टाचा ?
अपांगातुनी पाहुन - गेले ?
--गंधच उरला शिकेकाइचा !

गांभीर्यातच लोभस चंचल
हालचाल ती सहज जाणवे
शालिन्याने उठून दिसले
हास्य कुणाचे अवखळ, मिष्किल ?

--अशांत अथवा प्रशांत निद्रा
येतसे कुणी चाळवावया
अपूर्णतेची जाणिव घेउन
अपूर्णतेची जाणिव द्याया

* *

होणारी

श्याम सोनारे

उघडी कवाड
आज उद्या आड
गोजिरं रुपडं
दिसणार

लय झाली आता
भलमनसाई
पडलेली खाई
बुजणार

सोन्यासुवागीचा
मिळणार गुण
होणारी होऊन
राहणार

* *

अनुक्रमणिका

लपंडाव

राजामुकुंद

फूल कोंभात लपला
रसरशीत गारवा
अर्ध्यावरच राहिला
माझा कपिल हिरवा.

झुंजगुंजूदे विठीत
झिंग जांभूळ श्वासाची
कळी समृद्ध होआवी
पाचोळल्या जीवनाची...!

★ ★

वेड

रामदास सेलूकर

भावुक काव्याच्या ओळी
का आळविल्यास तू ?...
तुझ्या अपार अथांग नेत्र-निलिमेत !
मला जडले नसते—
असे वेड...
विरह व्याकुळ राधेसारखे !...
अर्ध्या रात्री...पापण्यांच्या ओठांनी
काळोखाला...चुंबायाचे !...,
हिमगार पहाटेला
शुक्राला साक्षी ठेऊन
बर्फाचा पाऊस...बर्षायाचे !...
हिवाळी सांजेला
क्षितिजावर जळणाऱ्या
स्मृति-चितेला...आलिंगायचे !...
अगस्ती ऋषीप्रमाणे
सौंदर्याचा सागर
मूक संवेदनांनी प्राशूनहि
अतृप्तीचा शाप...
हृदयाच्या मरुभूमीत
जळत आहे...
[illegible] [illegible] एकमेकांत भिनत आहे !

श्री अप्रबुद्ध : व्यक्ति, विचारधारा व वाङमय

श्री. य. गो. मालवे,

चिटणीस, वि. सा. संघ, नागपूर

साहित्याचा पिंड, अध्यात्मिक आवड, देशहिताची कळकळ, स्नेहार्द्रता, निर्भीडपणा, ध्येयनिष्ठा आणि प्रसिद्धिपराङ्मुखता, हे श्रीअप्रबुद्ध यांचे स्वभावविशेष आहेत. कांही गाजावाजा न करिता निमूटपणे मनुष्य केवढे कार्य करू शकतो याचे हे एक लहानसे उदाहरण आहे. श्री. अप्रबुद्ध हे नागपुरातील एक विद्याव्यासंगी गृहस्थ आहेत, यापलीकडे त्यांची माहिती फारच थोड्यांना असेल. या लेखात श्रीअप्रबुद्ध यांच्या साहित्यसेवेचा व विशेषतः विचारधारेचा थोडासा परिचय करून देण्याचे योजिले आहे.

प्रारंभी म्हटल्याप्रमाणे श्री अप्रबुद्ध यांचा मूळ पिंड साहित्यिकाचा. विद्यार्थीदशेत असतानाच त्यांना काव्य, कादंबरी, नाटक, लघुकथा, निबंध इ. सर्व प्रकारच्या वाङ्मयक्षेत्रामध्ये कांहीतरी कामगिरी करावी असे वाटत असे. तशा प्रकारचे त्यावेळेला त्यांनी सुरू करून अर्धेमुर्धे राहिलेले पुष्कळ लेखन अजूनहि त्यांच्याजवळ सापडते. विशेषतः कविता करण्याचा नाद फार होता. परंतु तेव्हापासूनच प्रसिद्धीची यत्किंचित्‌हि लालसा नसल्यामुळे दोनचार मित्रांना वाचून दाखविण्यापलीकडे त्या कविता कधीहि जास्त प्रकाशात आल्या नाहीत.

विचारप्रधान वाङ्मयनिर्मिति

साहित्याची इतकी ओढ असूनहि तो प्रांत त्यांनी सोडून दिला. याचे कारण इतक्या लहान वयातहि स्वामी विवेकानंद व रामतीर्थ यांच्या ग्रंथांच्या अभ्यासामुळे त्यांच्या हे लक्षात आले होते, की अनेकविध कारणामुळे भारतराष्ट्र आपल्या केन्द्रापासून ढळले आहे. आजची परिभाषा त्या वेळेला अस्तित्वात नव्हती. परंतु ती उपयोगात आणावयाची म्हणजे भारतवर्ष उत्तरोत्तर आपल्या अस्मितेला पारखा होत आहे आणि तसा तो पारखा होत असेल तर नुसते राजकीय स्वातंत्र्य मिळवूनहि काही उपयोग नाही, असा त्यांच्या मनाचा निश्चय झाला होता. परंतु

अनुक्रमणिका

हे त्याचे केंद्र तरी कोणते आणि अस्मिता म्हणजे तरी काय ? ब्रह्मर्षि श्री अण्णासाहेब पटवर्धन यांच्या सहवासांत असता त्याविषयीच्या त्यांच्या कल्पनांना निश्चित स्वरूप प्राप्त झाले आणि त्यामुळे ललित साहित्याऐवजी विचारप्रधान वाङमयनिर्मितीकडे त्यांची दृष्टि वळली. त्यांच्यात झालेल्या या परिवर्तनाविषयी त्यांना कधीहि वाईट वाटले नाही.

सनातन व वर्तमान यांचा समन्वय

पं. सातवळेकर म्हणतात त्याप्रमाणे यांचे वाङमय मौलिक असून स्वतंत्र प्रज्ञेचे आहे. विदर्भ साहित्य संघाने सत्कार केला त्यावेळी डॉ. नियोगी यांनी ते समन्वयवादी आहेत असे त्यांचे वर्णन केले. ते एका अर्थाने फार समर्पक आहे. परंतु सनातनत्व आणि समन्वयवाद याचा अर्थ ते वैदिक परंपरा आणि आजची परिस्थिति यांचा समन्वय लोकाभिरुचीप्रमाणे घालणारे, असा नाही. वैदिक धर्माची सनातन तत्त्वे आणि शाश्वत मूल्ये यांचा समन्वय अर्वाचीन वाढत्या विज्ञानाशी करून दाखविणे हा त्यांचा समन्वयीपणा आहे. म्हणूनच आधुनिकांना त्यांच्या चातुर्वर्ण्यनिष्ठेचे रहस्य समजणे कठीण जाते. त्यांना चातुर्वर्ण्याची मातब्बरी वाटते ती ते गीताप्रणीत आहे अथवा मनुप्रणीत आहे म्हणून नव्हे, तर त्यांच्या समजुतीप्रमाणे भारतीय संस्कृतीचा मुख्य आधार जे योग नामक प्रयोगशास्त्र, तत्प्रणीत ते आहे म्हणून वाटते; एरव्ही मनूचीहि किंमत नाही आणि गीतेचीहि नाही. भारताच्या अस्मितेविषयी यथार्थतेने लिहावयाचे काम किती कठीण आहे याचे दिग्दर्शन प. वा. प्रो. शहा यांनी आपल्या पुस्तकात फार सुंदर केले आहे. कोणत्याहि तऱ्हेचा अर्वाचीन संस्कार मध्ये न येऊ देता, प्राचीनांच्या अंतरात्म्याशी पूर्ण तादात्म्य पावून त्याची खरी जाणीव करून घेणे हे तर आवश्यक आहेच, परंतु त्याबरोबरच ती जाणीव इंग्रजी छापाच्या आजच्या जनतेस त्यांना परिचित असलेल्या कल्पनांच्या साह्यानेच करून देण्याचे दुर्घट कार्यहि तितकेच महत्त्वाचे आहे. But the task of real understanding and correct interpretation of our anient authorities (for the modern generation of Indians are foreigners in such subjects) will not be fully and truly performed unless the modern interpreter has steeped himself fully in the real soul of ancient writers, and is, at the same time, eqully at home with the modern forms of those concepts expressed in English. (Ancient Foundations of Economies, P.9)

त्यांच्या वाङ्मयाचा हाच विशेष आहे की, नुसतेच ग्रंथात काय सांगितले आहे हे न सांगता, त्याचे शास्त्रीय तत्त्व काय आहे आणि अर्वाचीन शास्त्रेहि हळूहळू त्याच वळणावर कशी येत आहेत; हे त्यांनी साधार दाखविले आहे.

वैदिक संस्कृतीची पुनर्घटना

प्राप्त परिस्थितीत वैदिक संस्कृतीची पुनर्घटना झाली पाहिजे असे ते म्हणणारे आहेत. या पुनर्घटनेचे स्वरूप काय असले पाहिजे हे त्यांनी सुमारे २८ वर्षांपूर्वी लिहिलेल्या आपल्या ग्रंथात स्पष्ट मांडले आहे. त्याचा मुख्य सिद्धांत हा आहे, की आजचा सारा अभ्यास चुकलेला आहे, कारण तो पाश्चात्य दृष्टि-कोनातून केला जातो. पाश्चात्य दृष्टिकोन अजिबात चुकलेला आहे हे आता पाश्चात्य पंडितच म्हणू लागले आहेत. पाश्चात्यांची मुख्य चूक ही आहे की, संस्कृतीच्याहि अनुगत आणि निर्गत अशा अवस्था असू शकतात याची त्यांना कल्पना झाली नाही. भारतीय संस्कृति ही निर्गतावस्थेत (Deductive) आहे, तिच्या अभ्यासाचे नियमहि वेगळे असले पाहिजेत. अभ्यास केला तर असे आढळून येते, की भारतीयांच्या जवळ आजच्या विज्ञानाच्या कक्षेत आता कोठे थोडे थोडे येऊ लागलेले एक पद्धतशीर शास्त्र होते. त्या शास्त्राच्या साह्याने मनुष्यजातीच्या कल्याणाचा त्यांना जो साक्षात्कार झाला व त्यासंबंधी जे स्वयंभू सिद्धान्त समजले त्यांच्या साह्याने निरनिराळ्या क्षेत्रात प्रयोग करूनच त्यांनी समाजशास्त्र, अर्थशास्त्र धर्मशास्त्र, शासनशास्त्र, कामशास्त्र इ. जीवनविषयक सर्व शास्त्रांची मूलतत्त्वे आणि शाश्वत मूल्ये ठरविली. पाश्चात्य विज्ञानाचा मधल्या काळातील उन्माद आता ओसरला असून सुलिव्हनने म्हटल्याप्रमाणे, ते आता पूर्णपणे विनम्र झाले आहे आणि महत्त्वाची गोष्ट ही आहे की अगदी बारीक-सारीक गोष्टींपासून ते खऱ्या भारतीय वळणावर येईल की काय, असे दिसू लागले आहे. अशा वेळी हल्लीच्या वैचारिक गोंधळात हातचे सोडून पळत्याच्या मागे न लागता, कसे से का होईना, भारतीयांनी आपले मूळ राखून ठेवले तर पुन्हा त्यांना जगाचे गुरुत्व करता येईल. असे गुरुत्व करण्याची मनुष्य जातीच्या हिताकरिताच आवश्यकता आहे असे त्यांना वाटते. पुनर्घटनेसंबंधी त्यांचे मुख्य सूत्र हे आहे की, कोणत्याहि बाबतीत भारतीयांनी गाठलेला ध्येयाचा ध्रुवबिंदु न ढळू देता सर्व प्रश्नांची परिस्थित्यनुरूप सोय लावून द्यावी. असे करीत असतांना कांही त्याग अवश्यच आहे. तो संस्कृतीच्या जिव्हाळ्याने करण्यास तयार व्हावे या महद् सूत्राला धरून त्यांनी आपले सर्व वाङ्मय निर्माण केले आहे.

विचारवंतांनी केलेला गुणगौरव

अप्रबुद्ध-साहित्याचा अभ्यास करणाऱ्या कोणालाहि एक गोष्ट मान्य करावी लागेल की वाङमय या दृष्टीनेहि त्याची योग्यता मोठी आहे. मराठी वाङमयात त्याचे एक विशेष स्थान आहे. माझ्यासारख्या अल्पमतीने त्यांच्या वाङमयाचे काय मूल्यमापन करावयाचे ? तेव्हा त्या कार्यात न पडता थोर साहित्यिक व विचारवंत यांना त्यांच्या वाङमयाबद्दल काय वाटते हे सांगणे उचित होईल. 'नवशक्ती'च्या साहित्यशौंडाने म्हटल्याप्रमाणे 'त्यांची अभिव्यक्ति प्रामाणिक आहे आणि म्हणूनच नकली नवमतवाद्यापेक्षा आणि सुधारकापेक्षा त्यांची वाणी तेजस्वी वाटते" हे सर्वस्वी यथार्थ आहे. प्रामाणिकपणा, पिळदारपणा, ओजस्विता, प्रौढपणा, सहृदयता, खोलपणा इ. अनेक गुणामुळे आणि दृष्टान्तादिकांचा समतोल कोटिक्रम आणि प्रतिपादनाचा ओघ इ. गुणामुळे त्यांचे लेखन आकर्षक वाटते.

1. "Aprabudha's exposition of Yoga is that of an ardent and sincere aspirant, but at the same time critical and scientific"

—*Prabudha Bharat, Mayavati*

2. "An inspired treatise on Yoga, which contains a very useful commentary of the Yogasutras"

—Prof. L. Renou, Paris

३. साहित्यसम्राट श्री. तात्यासाहेब केळकर म्हणतात—

"एक गोष्ट दिसून आली व ती कोणालाहि मान्य करावी लागेल की तुम्ही ऋग्वेदाचे संशोधन केले ते खोल बुद्धि चालवून केले आहे. आणि युरोपीयच काय पण स्वदेशीय वैदिक पंडितांशीहि निर्भयपणे झुंजण्यास तयार झाला आहा ...आपल्या चिकित्सक बुद्धीचे व परिश्रमाचे कौतुक वाटते..."

४. श्रुतिबोधकार श्री. रा. वि. पटवर्धन–

"संशोधनपद्धति तर्कशुद्ध व निर्भीड आहे आणि युरोपियनांच्या थोतांडी दबकावणीपुढे न वाकण्याइतका कणखरपणाहि आहे . वैदिक संस्कृतीचा यथातथ्य आदर्श श्री. अप्रबुद्ध यांनी आज महाराष्ट्रीय जिज्ञासूपुढे ठेवला आहे, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले पाहिजे."

वेदमूर्ति पं. सातवळेकर—

" आपण जी चित्र रमणी प्रतिपादन केली आहे ती सर्व धर्मविचारकांस मध्य दृष्टीने विचार करावयास लावील. यूरोपियन विचारकांची मते आपण त्यांच्याच दृष्टीने खोडून काढली आहेत, हा भाग माझ्या दृष्टीने महत्वाचा आहे."

६ समर्थसेवक श्री. शंकर श्रीकृष्ण देव—

" काहीशा प्रतिकूल मनोवृत्तीत वाचण्यास सुरुवात केली, पण कळविण्यास आनंद वाटतो की वाचनाचा शेवट अनुकूल मनोवृत्तीत झाला ."

७. श्रीमान् दादासाहेब खापर्डे —

यांच्य ग्रंथांची वर्णनशैली व भाषा...राष्ट्राच्या प्रचलित स्थितिविषयी अंतःकरण फुटून बाहेर आली असल्यामुळे भेदक, उद्बोधक व सूचक अशी झाली आहे. आणि त्यामुळे कृत्रिमतेचा तिला गंध नसल्यामुळे "कृताभ्यंगस्नाना कनकमणिभूषाविरहिता" अशा उग्रतेज पतिव्रतेच्या पवित्र साध्यासुध्या सौंदर्याप्रमाणे तिच्यात एकप्रकारची मोहकता आली आहे. "

श्री अप्रबुद्धांची वाङमयसंपदा

खाली त्यांच्या वाङ्मयसंपदेची माहिती अभ्यासकांकरिता देत आहे.

१. श्री अण्णासाहेब पटवर्धन यांचे चरित्र. हे त्यांचे पहिले पुस्तक. यात त्यांनी आत्म्या एवं विचारसरणीचा सूत्ररूपाने परिचय करून दिला आहे. (पाने सुमारे ४५०).

२. वैदिक संस्कृतीची पुनर्घटना—पाने सुमारे २५०. विशेषतः या पुस्तकात आणि "वेदांचे अपौरुषेयत्व" या पुस्तिकेत आपले चातुर्वर्ण्यासंबंधीचे स्वतंत्र विचार मांडले आहेत,

३. ऋग्वेदाचा संदेश —या पुस्तकात पाश्चात्यांनी ऋग्वेदाच्या संशोधनाच्या नावाखाली जे अनेक तारे तोडले आहेत त्यांचा साधार समाचार घेतला आहे. साहित्यसम्राट केळकर श्रुतिप्रचारक बाबासाहेब पटवर्धन, पं. सातवळेकर यांनी या पुस्तकाची मुक्तकंठाने स्तुति केली आहे. पाने सुमारे ४००.

४. वेदांचे अपौरुषेयत्व—पं. सातवळेकरांच्या "वैदिकधर्म" मासिकाकरिता लिहिलेल्या लेखाचे मराठीकरण. वेदांच्या स्वयंभूतेची, अपौरुषेयतेची आणि सृजनशक्तीची भारतीयांची कल्पना ही एक वेडगळ कल्पना नसून आजच्या बळकट पदार्थविज्ञानशास्त्रात धरूनच आहे, हे यात समजवून सांगितले आहे.

५. ऐक्याचे खरे शत्रु--या नऊ लेखात ऐक्याची खरी तहान सनातन्यांनाच कशी आहे आणि त्यांच्या नावाने खडे फोडणारे लोकच ऐक्याचे खरे शत्रु आहेत असे दाखविले आहे.

६. भारतीय विवाहशास्त्र (भा. १)—यांत स्त्री-पुरुषविवाहाचा शास्त्रीयदृष्टचा मनुष्य जातीच्या दृष्टीने आणि भारतीय धारणेच्या दृष्टीने सखोल विचार केला आहे.

७. हिंदु कोडाचे कृष्ण-कारस्थान--या आठ व्याख्यानात मराठयांच्या पूर्वपीठिकेपासून तो तहत ५७ च्या स्वतंत्र्ययुद्धापर्यंत विषय आले आहेत. शुद्ध ऐतिहासिक भूमीवर त्यांचा उदय आणि ऱ्हास यांची चर्चा केली आहे

९. दोन साम्यवाद—पूर्वी येथील 'आदेश' पत्रात लिहिलेल्या वीस लेखांचा यात संग्रह आहे. वस्तुतः साम्यवाद हेच रशियन आणि भारतीय संस्कृतीचे ध्येय असून त्यांच्या कल्पना मात्र विसदृश कशा झाल्या आहेत, शास्त्रीय दृष्टचा पाहिले तरी रशियन साम्यवाद हा लंगडा कुठे पडतो, भारतीय साम्यवाद हाच खरा साम्यवाद कसा आहे इ. विषयांची चर्चा यात आहे.

१०. लाल गुंडगिरी—भाई डांगे यांच्या 'India from Primitive Communism to Slavary' या पुस्तकाचे निर्भीड आणि तर्कशुद्ध खंडन.

११. ब्राह्मण : एक राष्ट्रीय प्रश्न--यात ब्राह्मणासंबंधीच्या सर्व प्रश्नांचा राष्ट्रीय दृष्टचा निर्भय विचार करून, अजूनहि राष्ट्राला ब्राह्मणांची आवश्यकता कशी आहे याची चर्चा असून ब्रह्मद्वेषाच्या या आगीतहि राष्ट्राकरिताच ब्राह्मणांनी ब्राह्मण म्हणून जगण्याची आवश्यकता कशी आहे ते विशद केले आहे.

१२. पातंजल योगसूत्रे (प्रथम पाद)—पातंजल सूत्राच्या पहिल्या पादावर आजची विज्ञानशास्त्रे लक्षात घेऊन केलेले स्वतंत्र प्रतिपादन आहे. विशेषतः केवळ शास्त्रजिज्ञासूपेक्षा अभ्यास करू म्हणणाऱ्याला उपयोगी पडावे असे त्याचे धोरण आहे.

१३. शिक्षणाचा खेळखंडोबा—नागपूर काँग्रेसच्या वेळेला मुद्दाम प्रसिद्ध केलेले पुस्तक. शिक्षणक्षेत्रातील आजच्या दुरवस्थेचे स्वरूप, तिची पूर्वपीठिका आणि कारणे यांचे साधार विवेचन यात आहे.

१३. शिक्षा के साथ खिलवाड—वरील पुस्तकाचा येथील त्रिम्बाणी नगर महाविद्यालयातील प्रा. श्री गोपाळ गुप्ता यांनी केलेला हिंदी अनुवाद.

१५. द्वितीय दत्तावतार श्रीनरसिंह सरस्वती—क्षेत्र गाणगापूर येथील पंचशती महोत्सवाच्या प्रसंगाने विशेषतः श्रीगुरुचरित्रास धरून लिहिलेले पुस्तक.

अनुक्रमणिका

यात दत्तावतारासंबंधी ऐतिहासिक दृष्टचा ज्या काही विचित्र कल्पना केल्या जातात त्यांचा फोलपणा दाखविला असून, श्रीदत्तावताराचे रहस्य, त्या संप्रदायाचे महाराष्ट्रातील विशेष कार्य यांची चर्चा असून, सांप्रदायिकास उपयुक्त अशी अनेक प्रकारची माहिती श्रीगुरुचरित्रावर नवीन प्रकाश टाकणारी आहे.

इंग्रजी पुस्तके

१. Marxism X'rayed—" लाल गुंडगिरी "चे इंग्रजी भाषांतर.

२. Immanance of Vedas—वेदांच्या अपौरुषयेत्वाचे इंग्रजी भाषांतर.

३. Brahmarshi's Gospel—ब्रह्मर्षि श्री. अण्णासाहेब पटवर्धन यांच्या इंग्रजी पुस्तकाचे संपादन व प्रकाशन.

४. Science of Yoga (Vol. 1)—पतंजलीच्या पहिल्या दोन पादावरील स्वतंत्र इंग्रजी टीका, विस्तृत उपोद्घात आणि परिशिष्टे यासह.

५. Science of Yoga (Vol. 2)—विस्तृत उपोद्घात आणि भारतीयांच्या विश्वकोषाविषयीच्या कल्पना सांगणारी परिशिष्टे यासह. या भागाला पुणे विद्यापीठाकडून साडेसातशे रुपयांचे अनुदान मिळाले आहे.

होऊ घातलेली प्रकाशने

१. Message of Rigveda—ऋग्वेदाचा संदेश या ग्रंथाचे इंग्रजी भाषांतर. याच्या प्रकाशनाकरिता पुणे विश्वविद्यालयाकडून साडेसातशे रुपयांचे अनुदान मिळाले आहे.

२. **स्वच्छंद-गीत**—श्री. अप्रबुद्ध यांच्या काही कवितांचा लहानसा संग्रह. याविषयी विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे हे लिहितात, " श्री. अप्रबुद्ध यांचा 'स्वच्छंद-गीत' हा कवितासंग्रह मी पुनःपुन्हा वाचला. त्याची गोडी अवीट आणि मन प्रसन्न करणारी आहे. इ. स. १९०६ ते १९४० या कालखंडात रचिलेल्या या कविता १९६० च्या परिवर्तनाच्या काळातहि नवीन वाटतात; इतकेच नव्हे, तर त्यातील भावनोत्कटता आणि प्रासादिकता मनावर विशेष ठसा उमटविण्यास समर्थ ठरतात."

सुमारे सहा वर्षे येथील 'धर्मवीर' साप्ताहिकाचे वास्तविक संपादन ते करीत होते. लघुकथा, पुस्तकपरीक्षणे, निरनिराळ्या महत्त्वाच्या विषयावरील लेख व लेखमाला, व्याख्याने इ. रूपाचे वाङ्मय फार मोठे व महत्त्वाचे आहे. श्री. अप्रबुद्ध यांच्या वाङ्मयसेवेचा थोडक्यात असा आढावा आहे.

卐

अनुक्रमणिका

'भाऊसाहेबांच्या बखरीतून व्यक्त होणारे भारतीयांचे स्वभावविशेष

प्रा. माणिक के. बैतुले, एम्. ए. (मराठी-हिंदी), साहित्यरत्न

१ प्रास्ताविक

कृष्णाजी शामराव विरचित 'भाऊसाहेबांची बखर' हा ऐतिहासिक दृष्टया एक अमोल ग्रंथ आहे. प्रस्तुत ग्रंथात पानपतच्या पराभवाची अतिशय जिव्हाळयाने मीमांसा केली आहे. बखरीचा हेतु कोणताहि असो, भारतीयांच्या इतिहासात पराभवाची, अवनतीची जी जी कारणे अलेक्झांडरच्या स्वारीपासून प्लासीच्या लढाईपर्यंत आढळतात त्या सगळयांचा निष्कर्ष म्हणजेच भारतीयांचा विशिष्ट स्वभाव, तो प्रस्तुत बखरीत अतिशय ठळकपणाने सूचित झाला आहे. वैयक्तिक दृष्टीने कोणताहि गुण कितीहि उच्च असला तरी राष्ट्राच्या दृष्टीतून दुष्परिणामाला कारणीभूत होणारा गुण हा दुर्गुण म्हणून तिरस्करणीयच ठरेल यात शंका नाही.

२ मराठयांचा रजपूत, जाट व मोंगलांशी संबंध

शाहूची कारकीर्द परिल्या बाजीरावाच्या कर्तृत्वाने वैभवाच्या अत्युच्च शिखरावर होती. दक्षिणेत निजाम, राजस्थानात रजपूत, दिल्लीला बादशहा व अयोध्येला नबाब हे सारे तत्कालीन सत्ताधीश मराठयांना वचकून होते. दिल्लीचा बादशहा मराठयांच्या मूठीत असून वजीर गाजुद्दीखान मराठयांचा हस्तक होता. अंताजी माणकेश्वर हा दिल्लीचा सीमारक्षक आणि लक्ष्मीनारायण हा लाहोरचा सुभेदार होता. या परिस्थितीचा मराठयांनी योग्य तो उपयोग करून घेतला नाही. पहिल्या बाजीरावाने नावारूपाला आणलेले शिंदे-होळकर, बाजीरावानंतर स्वामिनिष्ठ तर राहिले नाहीच, पण परस्पर द्वेष्टे आणि राजलोभी बनले केंद्रीय सत्ता परावलंबी झाली. मोहिमेचा खर्च भागविण्यासाठी मराठयांच्या स्वाऱ्या मोगलांच्या ऐवजी स्वतःपेक्षा किंचित दुर्बल असलेल्या रजपूत आणि जाटावर अत्यंत अविचारीपणाने होऊ लागल्या. चाळीस लक्ष रुपये द्यायला तयार झालेल्या

सूरजमल जाटाशी १७५३ मध्ये रघुनाथराव पेशवे युद्ध करू लागले. मारवाड प्रांती रामसिंग विरुद्ध विजयसिंग यांच्या गृहकलहात शिंदे रामसिंगाचा पक्ष घेतात आणि होळकर विजयसिंगाचा पक्ष घेतात. बुंदीचा राजा मरण पावल्याबरोबर पाऊणकोट रुपये घेऊन राजस्त्रीच्या निमंत्रणावरून शिंद्यांनी तिच्या मुलास गादीवर बसविले. याप्रमाणे रजपुतांच्या कारभारात मराठ्यांचा हस्तक्षेप सारखा सुरू होता व तोहि केवळ वैयक्तिक भूमिकेवरून. फलतः भाऊसाहेबांच्या पानपतच्या मोहिमेत त्यांना जाटांनी मोकळेपणानं मदत केली नाही व रजपूतांनी तर उघड उघड दुराणीचा पक्ष घेतला होता. रजपूत, जाट आणि मराठे यांचे निखालस ऐक्य झाले असते तर निश्चितपणे दुराण्यांना मराठ्यांनी दाद दिली नसती.

३. भारतीयांचा गृहकलह

राष्ट्र आणि धर्म उभय दृष्टीने मराठ्यांचे खरे शत्रू मुसलमान. इंग्रजांचा संबंध १७६१ म्हणजे पानिपतनंतरच मराठ्यांशी खराखुरा आला. परंतु इतिहास असे दर्शवितो की मराठे आपल्या खऱ्या शत्रूशी तेवढ्या जोमाने कधीच लढले नाहीत, जितके ते परस्परात रजपुतांशी आणि जटांशी लढले. शाहू छत्रपतीच्या कारकीर्दीत पेशवे आणि प्रतिनिधि असा संघर्ष होता. छत्रसालाला बंगषाच्या संकटातून मुक्त केल्यावर मराठ्यांचा बुंदेलखंडात प्रवेश झाला आणि त्यानंतर शिंदे, होळकर, गायकवाड हे बाजीरावाने थोर पदी चढविलेले मातब्बर सरदार ग्वाल्हेर, इंदूर आणि बडोदा या ठिकाणी बद्धमूल झाले व मारवाड, बुंदी, मेवाड, जयपूर इत्यादि राज्यातील रजपूत राजांच्या गृहकलहात हस्तक्षेप करून आपल्याच धर्मीयांना उपद्रव पोहचवू लागले. याचा परिणाम प्रथम पानपतात दुराणीशी आणि नंतर इंग्रजांशी झालेल्या युद्धात मराठ्यांना भोगावा लागला. मराठ्यांच्या संबंधी रजपूतांना व जाटांना कधीहि आपुलकी वाटली नाही. आक्रमक, लुटारू, स्वार्थी आणि सैन्याचे ठेकेदार हीच परकेपणाची भावना त्यांच्याबद्दल रजपूतांना सतत वाटत राहली. प्रस्तुत लेखाला फक्त 'भाऊसाहेबांची बखर' हाच आपण आधार घेत आहोत. हा आधार मर्यादित आहे. परंतु गृहकलह, आपसात यादवी या कारणासोबत एकधर्म व एकराष्ट्रत्वाची कल्पना भारतीयांना कधीच शिवली नाही, हेहि एक कारण त्यांच्या पराभवाच्या प्रत्येक प्रसंगातून स्पष्ट होईल. कांही ठळक उदाहरणे द्यावयाची असल्यास पुढील उल्लेख करिता येईल. अलेक्झांडरशी झालेल्या युद्धात पोरस व आंभिक; महंमद घोरीच्या स्वारीत पृथ्वीराज व जयचंद; अल्लाउद्दीन खिलजीच्या स्वारीत गुजरात व मेवाड; अकबराच्या कारकीर्दीत मेवाड व मारवाड; यांच्यात गृहकलहाची परंपरा सारखी चालत

आलेली दिसून येते. पानपतच्यापूर्वी म्हणजे १७५३ च्या सुमारास रजपुतात जशी एकी नव्हती तशीच मराठ्यांतहि राहिली नव्हती. एकाच सेनापती राघोबा-दादाच्या नेतृत्वाखाली जाटाशी झालेल्या युद्धात शिंदे-होळकरासारख्या सामर्थ्य-शाली सरदारांचे परस्पर वैमनस्य विकोपाला गेले. त्याचे पर्यवसान दोन्ही सरदारांनी युद्धातून विमुख होऊन सेनापतीला फशी पाडण्यात आणि रजपूतांच्या अंतर्गत युद्धात भाग घेण्यात झाले पुढे पंजाबात शीख, नेपाळात गुरखे, ब्रम्हदेशात ब्रम्ही आणि उत्तर हिंदुस्थानात मराठी संस्थाने यांच्या आपसातील यादवीचा परिणाम इंग्रजांना साऱ्या हिंदुस्थानात आपले साम्राज्य सहज रीतीने पसरविण्या-करिता झाला. प्रत्यक्ष पानपतच्या लढाईतसुद्धा शिंदे होळकरांच्याबद्दल भाऊसाहेब आणि पुण्याचें सरदार यांचे मत अनुकूल नव्हते. फलतः सारे मराठी सरदार दुराणीशी एकोप्याने कधीच लढले नाहीत.

४. राष्ट्रीय चारित्र्याचा अभाव आणि आत्मघातकी धोरण

राष्ट्रीय चारित्र्याचा भारतीयांना ऐन महत्त्वाच्या प्रसंगी विसर पडलेला दिसतो. वैयक्तिक मानापमान, वैयक्तिक स्वार्थ, वैयक्तिक सुखदुःख या विकारांचा पगडा आमच्या मनावर राष्ट्रकल्याणाच्या विचारापेक्षा अधिक बसला होता. स्वतःच्या मुलाच्या निष्काळजीपणामुळे घडलेला रणांगणातील मृत्यूचा सूड जाटावर घेण्याची प्रतिज्ञा करताना कुंभेरीच्या वेढ्यात (१७५३-५४) मल्हारराव होळकर राजकीय परिणामाचा कोणताहि विचार करीत नाही. त्याच वेढ्यात होळकरांच्या प्रतिज्ञेविरुद्ध सेनापती राघोबादादाशी विचारपरामर्श न करता केवळ व्यक्तिगत प्रतिष्ठेसाठी स्वामिद्रोह व मित्रद्रोह पत्करून राष्ट्रीय दृष्ट्या हानिकारक असे जाटाशी सख्य करून शिंदे मारवाडात निघून जातात. आपल्या या वर्तनाचा परिणाम काय होईल याचा एकाहि मराठी सरदाराने आजवर विचार केला नाही. मराठे व इंग्रजांच्या संबधात पलीकडे महादजी शिंद्यांनी असेच आत्मघातकी धोरण पत्करून उत्तर हिंदुस्थानातील आपले राजकारण सांभाळण्यासाठी मुंबईकर इंग्रजांना शिल्लक ठेवले. प्रत्यक्ष पानिपतच्या मोहिमे-चाच इतिहास लक्षात घेण्यासारखा आहे "नंजीबखान रोहिला यास हाती धरून भागीरथीस पूल बांधून पलीकडे अयोध्या, ढाका व बंगाला आणि काऊर-देशपावेतो मोहिम करावी......हे न करिता तुम्ही नजीबखान याचे पारिपत्य कराल तर तुम्हास पेशवे धोतरे बडवावयास लावतील." मल्हाररावाने तत्पूर्वी जनकोजीला दिलेला सल्लाहि लक्षात घेण्यासारखा आहे "हिंदुस्थानात एक नजीबखान मात्र मूळ राहिले आहे. त्याचे पारिपत्य केलिया पेशवे अटकेपासून -जासूदाहातून पैसा आणवतील. मग तुम्ही आम्ही सहजच निर्माल्यवत जाहलो

मग कोणी पुसणार नाही यास्तव एवढे कूळ रक्षून जे करणे ते करावे." (भा. व. ४७ कलम ४८–४९) हा नर्जीबखान रोहिला शिल्लक होता म्हणूनच अहमदशहा अब्दाली, सुजाउद्दौला आदि एकत्र होऊन दत्ताजीचा व पेशव्यांचा मोड झाला. आणि हे सारे दिल्लीच्या गाजुद्दीखानाशी केलेला मात्रागमनीपणा दृष्टोत्पत्तीला आल्यावर घडले. मराठ्यांच्या या आत्मघातकी वर्तनानेच सतत त्यांचा नाश होत गेला. शिंदे व राघोबादादा यांच्या अमर्याद लोभी वृत्तीने दिल्लीच्या सत्तावीस लक्षाच्या तीन तोफाकरिता दिल्लीचा वजीर गाजुद्दीखान याला केवळ असंतुष्टच केले नाही, तर शत्रूहि बनविले. शिंदे आणि नर्जीबखान यात मध्यस्थी करण्याचे महान पातक गोविंदपंत बुंदेलेने केले आणि शिंद्याशीहि केलेली बेईमानी उघडकीस आल्यावर याच गोविंदपंताने शिंद्यांना साहाय्य न करता नजीबखानास पाच लक्षाचा लाच घेऊन शिंद्यांच्या तावडीतून पळून जाण्यास मदत केली. येथे आणखी एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की स्वामिद्रोह, मित्रद्रोह, धर्मद्रोह करणारा एकहि मराठा सरदार प्रायश्चित्ताशिवाय राहिला नाही. नजीबखान शिंद्यावरच उलटला. त्याला वाचविणाऱ्या दत्ताजीचा कुतुबशहाने शिरच्छेद केला. नर्जीबखानाला वाचविणारा दुसरा सरदार गोविंदपंत बुंदेला त्यालाहि दुराणीने कपटानेच ठार केले. शिंदे होळकरांच्या बद्दल ईर्ष्या करणारा बळवंतराव गणपत यांचे हि तीच वाट लागली. दिल्लीचे पातशाही तख्त काढण्याच्या प्रसंगी पाच लक्ष रुपये देणाऱ्या सूरजमल जाटाचा सल्ला नाकारून संपूर्ण छत काढले. ते केवळ तीन लक्षांचे भरले. तात्पर्य, जाटाचे आर्थिक साहाय्यहि नाकारले आणि त्याला नाराजहि केले. इतकेच नव्हे तर जाटाचे भाऊसाहेबांनी काहीच ऐकले नाही. याहि आत्मघातकी धोरणाचे प्रायश्चित्त साऱ्या मराठेशाहीला पानपतच्या मोहिमेत भोगावे लागले. तात्पर्य, आमच्या नेत्यांना दूरदृष्टि तर नव्हतीच, पण कुणाचा हितकारक सल्लाहि मानवला नाही.

५. बुद्धीशी वैर व भावनाविवशता

भारतीयांच्या ठिकाणी बुद्धीचा प्रकर्ष कितीहि भारी असला तरी तिच्यावर भावनेचा फार मोठा पगडा बसलेला आढळून येतो. सदाशिवरावभाऊला कळते की द्रव्य पुरेसे नसता आपणाला मोहीम यशस्वी करणे कठीण जाईल. परंतु न मागण्याची प्रतिज्ञा करून एकदा निघाल्यावर प्राण गेला तरी बेहेत्तर, साऱ्या मराठेशाहीची अब्रू गेली तरी बेहेत्तर, पुण्याहून पैशाची व माणसांची मदत म्हणून मागणार नाही हा निर्धार भावनाविवश होऊन बुद्धीशी वैर केल्याचे स्पष्ट प्रत्यंतर आहे. मराठ्यांना गनिमी काव्यापलीकडे कुटिल नीति ठाऊक नव्हती. असाधारण शौर्य पराक्रमाचा कितीहि आत्मविश्वास असला तरी राजनीति कुटिल असते हे

केवळ मराठे पानिपतातच विसरले असे नव्हे तर भारताच्या संपूर्ण इतिहासात असे अनेक प्रसंग मागोमाग घडत आले आहेत. याउलट भारतीयांना पराभूत करणारा प्रत्येक शत्रू भारतीयांशी कपटाने वागूनच यशस्वी झाला अशी इतिहासाची साक्ष आहे. पानिपतच्या मोहिमेतला पहिला शत्रू नजीबखान दत्ताजी शिंदेशी कपटाने वागला व दुराणीची मदत येऊन पोचेपर्यंत त्याने दत्ताजींस सारखे झुलत ठेवले. शुजाउद्दौल्याने दत्ताजीशी कपटाने तह करण्याचा भास निर्माण करून भेटीस बोलाविले. सरतेशेवटी गोविंदपंत बुंदेल्याची रसद सुद्धा दुराण्यांनी कपटाने लुटली. अनेकदा बेसावध शत्रूवर हल्ला करून मुसलमानांनी मराठ्यांचा पाडाव केला. युद्धनीतीच्या दृष्टीने यात मुसलमानांचा काही दोष आहे असे आम्हाला वाटत नाही. परंतु मराठ्यांनी हे तंत्र ओळखून वागायला हवे होते. तथापि असे कधीच घडले नाही.

६. युद्धनीतीचा अभाव

कोणत्याहि मार्गाने एकदा जीव वाचवावा आणि नंतर पुनः तयारी करून आपल्या अपमानाचा आणि पराजयाचा सूड घ्यावा हे भारतीयांना त्याच्या शत्रूंनी अनेकदा शिकवूनहि उमगले नाही. शत्रूला रणात पाठ दाखवावयाची नाही आणि सेनापति म्हणून सैन्याच्या अग्रभागीच नित्य उभे राहावे हा आम्हा भारतीयांचा बाणा. त्याचाहि परिणाम पानिपतच्या मोहिमेवर झाला. दिल्लीस राहूनच पानिपतची मोहिम चालवावी, सेनापति सुरक्षित असेल तोपर्यंतच सैन्याची हिंमत टिकेल हे लक्षात घेऊन स्वतःच्या सुरक्षिततेविषयी शक्य ती दक्षता घ्यावी या सूत्राचे भारतीयांनी कधीच पालन केले नाही. दिल्ली सोडून भाऊसाहेब स्वतः कुंजपुऱ्यास गेले आणि अपयश व मृत्यु दोन्ही डोळ्यापुढे स्पष्ट दिसत असताहि माघार घेतली नाही व घेऊहि दिली नाही. "प्राणावर उदार होऊन केलेली भाऊगर्दी" प्रसिद्ध आहे. युद्ध पुकारताना वा तहकूब करताना मराठी सेनापतींनी सैन्याच्या मनाचा, शरीराचा तसे रणभूमीचा कधीच विचार केला नाही. एकाच मोहिमेत पराभूत सैन्याला नव्या दमाच्या सैन्याबरोबर मिसळू देऊ नये, हे सूत्रहि मराठ्यांनी लक्षात घेतले नाही. दुराण्याकडून पाडाव झालेल्या शिंद्यांच्या फौजेला बरोबर घेतल्याने इतर मराठी फौजेतहि भयाचे वातावरण निर्माण झाले.

७. पलायनवृत्ति

मराठ्यांच्या पळपुटेपणाविषयी बखरकारांची वचनें प्रसिद्ध आहेत. दत्ताजी शिंदेला नामी मराठी सरदार उत्तर देतात, "पाटील तुम्ही फौजेचे पाठीवर उभे

राहाल तर आम्ही इरेने झुंज करू. तुम्ही फौजेस टाकून पुढे जालेत तर आम्ही गनीम जातीचे. पाठीवर काडी उडतां तोच जे होणे ते होईल. नाहीतर झाडास बांधले तरी झाड घेऊन जातील, हा आमचा मराठ्यांचा स्वभाव. बोलावयाचा मात्र धर्म आहे की जेथे साहेबांचा पायपोस पडेल तेथे आमचे डोके पडेल. परंतु त्याचे वाटेकरी थोडे. नाहीतरी जेथे साहेबांचे डोके तेथे मल्याचा पायपोसहि पडणार नाही." (भा. ब. कलम ६८). "परंतु मराठे मनुष्य पळू लागलियावर कोणाची वीर कोणास नाहीशी होते. रांडेने सावळे हुसकटले तर झाडास बांधले असता झाड घेऊन बारा कोस पळतील." (भा. ब. कलम ७९). जोपर्यंत रणांगणावर निशाण आणि सेनापति आहे तोपर्यंतच भारतीयांनी युद्ध केले. ज्या क्षणी निशाण पडले त्याक्षणी सैन्याने कधीच दम धरला नाही. महंमद गझनीशी झालेल्या युद्धात अनंगपालाचा पराभव, पानपतच्या दुसऱ्या युद्धात हिमूचा पराभव, आणि पानपतच्या तिसऱ्या युद्धात भाऊसाहेबांचा पराभव निशाण पडल्यामुळेच झाला.

८. मुत्सद्दीपणाचा अभाव व विश्वासघात

पानिपतच्या मोहिमेत मराठ्यांच्या पराभवाचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे परस्परांबद्दलचा दीर्घद्वेष, सूडबुद्धी व अविश्वास. उत्तरेत दिग्विजय करणाऱ्या शिंदे होळकरांबद्दल दक्षिणेतल्या बळवंतरावांसारख्या सरदारास मत्सर आणि त्यामुळे भाऊसाहेबांसारख्या सेनापतीचा शिंदे होळकरांवर अविश्वास. या अविश्वासातून भावनाविवशतेने भाऊसाहेबांनी अनेक चुकीचे निर्णय घेतले. अल्पयशाचा दर्पहि मराठ्यांच्या ठिकाणी फार लवकर उत्पन्न होत असे. त्या दर्पाने अंधदृष्टि झाल्यामुळे प्राप्त परिस्थितीचा मराठ्यांनी कधीहि उपयोग करून घेतला नाही. दत्ताजीचा शिरच्छेद करणारा कुतुबशहा तावडीत सापडल्यावर प्रत्यक्ष जनकोजीने सांगूनहि भाऊसाहेबाने त्यास हाल करून ठार मारला. सूड उगविण्याच्या दृष्टीने हे ठीक असले तरी भाऊसाहेबांनी या ठिकाणी बुद्धीशी वैर केले. कोणत्या का कारणाने हुईना त्या वेळी मराठ्यांची बाजू बळकट नव्हती. कुतुबशहास मध्यस्ती घालून दुराणीशी तात्पुरता तह करता आला असता. पलीकडे सामर्थ्य वाढवून पुनः युद्ध करता आले असते.

गोविंदपंत बुंदेला आणि मल्हारराव होळकर यांनी जाणूनबुजून मराठेशाहीचा विश्वासघात केला. संकुचित व स्वार्थी दृष्टि ठेऊन शिंदे होळकर जाटास स्वस्थानी जाऊ देतात; नजीबखानास जिवंत ठेवतात, याचे फळ साऱ्या मराठेशाहीला भोगावे लागते. राघोबा व भाऊसाहेब यांचा मतभेद आणि नानासाहेबांचा

पक्षपात याचा परिणाम भाऊसाहेब व विश्वासरावासारखे दोन मोहरे असंख्य मराठी सैन्यासह केवळ इरेला पेटून गमावण्यात झाला आणि कौरवपांडवांच्या युद्धाचे भारताला जे परिणाम दीर्घकालपर्यंत भोगावे लागले त्याच स्वरूपाचे दुष्परिणाम पुढे मराठेशाहीला भोगावे लागले.

९. दुर्गुण की दुर्दैव ?—

याप्रमाणे भाऊसाहेबाच्या बखरीतून पराभवास कारणीभूत होणारी भारतीयांची वैशिष्टये अतिशय त्रोटक रीतीने या ठिकाणी उल्लेखिलेली आहेत. वस्तुत: प्रस्तुत विषय अतिशय व्यापक असून त्यावर एक स्वतंत्र ग्रंथच निर्माण होऊ शकतो. परंतु स्थलकालाभावास्तव केला तेवढा संक्षेप अनिवार्य आहे. वरील विवेचनावरून कदाचित् असा भ्रम उत्पन्न होण्याची शक्यता आहे की लेखकाच्या दृष्टीला मराठ्यांचा एकहि गुण उल्लेखनीय वाटला नाही की काय ? या भ्रमाच्या निरसनार्थ मला नमूद करावेसे वाटते की ज्यावेळी एखाद्या गुणाचा परिणाम समाजाला वा राष्ट्राला अपायकारकच ठरतो त्यावेळी त्या गुणाला दुर्गुणाच्या पंक्तीतच बसावे लागते. पानिपतच्या पराभवाची मीमांसा करताना जे जे अपायकारक आढळले त्याचा कटाक्षाने दुर्गुणातच समावेश करण्याचा मी प्रयत्न केला आहे. अन्यथा पानिपतचा पराभव मराठ्यांच्या दुर्गुणामुळे नसून दुर्दैवानेच घडला असे समर्थन करणारा लेख या ठिकाणी लिहावा लागला असता. यावरून लेखकाच्या मतासंबंधी गैरसमज करून घेण्याचे कारण नाही, एवढेच सांगून हा लेख येथेच संपवितो.

卐

एक बोधप्रद लोककथा

देवदूताचे वरदान

ना. रा. शेंडे, नागपूर

एक घनदाट जंगल होतं. जंगलाच्या मधोमध एक विशाल नदी वहात होती. या नदीमुळे जंगलाचे दोन भाग पडले होते. एक पूर्वेचा आणि दुसरा पश्चिमेचा. पूर्वेच्या जंगलात हंसांची तर पश्चिमेच्या जंगलात बगळ्यांची वस्ती होती.

हंस आणि बगळ्यात पटत नव्हतं. ते कधीच एक झाले नव्हते. उलट ते एकमेकाचा द्वेष करीत. कधी चुकून हंस किंवा बगळा इकडच्या तिकडे आला गेला तर तो बिचारा यमसदनीच जाई ! आणि मग दोन्ही जंगलात मोठी लढाई सुरू होई. सर्वत्र अशांतता पसरे. जंगल त्या घुमश्चक्रीत दुमदुमून उठे. इतका हाहाःकार होई की झाडेझुडपं आक्रोश करीत, लतापर्णे ढसढसा रडत. चंद्र–चांदण्या भीतीने दडून बसत. देवदेवताहि थरकापू लागत.

एका दिवसाची गोष्ट.

एका बगळ्याचं छोटसं बालक उडता उडता नकळत पूर्वेच्या जंगलात गेलं. त्याला नुकतेच पंख फुटले होते. अंगात नीट उडण्याइतपत बळ आलं नव्हतं. त्यामूळं ते थकून गेलं. इतकं की त्याला जागचं उठता येईना. धापा टाकीत ते नदीच्या किनाऱ्यावर बसतं न बसतं तोच हंसाच्या बालकांनी त्याला घेरलं. दोनचार शहाण्या हंसांनीहि बालकांना साथ दिली. बिचारं बगळ्याचं बालक भीतीनं घाबरून गेलं. आपले इवलाले नाजुक पंख फडफडवून त्यानं उडण्याचा प्रयत्न केला पण ते उडूं शकलं नाही. त्यानं जोरजोरानं ओरण्याचा यत्न केला पण त्याची आर्त हाक पश्चिमेच्या जंगलापर्यंत पोचू शकली नाही. गयावया करून ते त्या हंसांच्या बालकाकडे जीवदानाच्या आशेनं भिरभिर पाहू लागलं. आसवांनी जमीन न्हाऊन निघाली. परंतु त्याची कीव कुणाला आली नाही. त्यानं मोठ्या प्रयासानं सारं बळ एकवटून आपल्या आईला हाक देण्याचा पुन्हा प्रयत्न केला, तोच त्याची कोमल मान मुरगळली गेली. एक बारीकसा चीत्कार चोचेवाटे हवेत तरंगला आणि मग ते बगळ्याचं बालक तडफडत तडफडत मरण पावलं !

त्या बालकाच्या हृदयस्पर्शी मृत्यूची वार्ता बगळ्यांना कळली तेव्हा त्यांना मनस्वी दुःख झालं. त्यांचा आत्मा तळमळून उठला, अंगातील रक्त सळसळलं.

अनुक्रमणिका

त्या बालकाच्या झालेल्या अमानुष हत्येची भयंकर चीड आली. झालेल्या अन्यायानं त्यांची अंतःकरणं पेटली ! एक विराट सभा भरून बगळ्यांनी एकमुखी प्रतिज्ञा घेतली, 'जोपर्यंत हंस आमचं बालक जीवंत करणार नाहीत तोपर्यंत आम्हं स्वस्थ बसणार नाही. याचा बदला आम्ही सहस्र पटींने घेतल्याशिवाय रहाणार नाही ! '

या भीषण प्रतिज्ञेनं केवळ संपूर्ण जंगलच नव्हे तर आकाशपाताळ थरारून गेलं. वाराहि कंपित झाला. झाडझुडपंहि थराथरा कापू लागली. आता काय घडणार या चिंतेनं देवदेवताहि गांगरून गेल्या.

पूर्ण बदला घेतल्याशिवाय अन्नपाणी ग्रहण करायचं नाही असा निर्धार करून, हजारो हजारो टोळ्यांच्या जमावानिशी बगळ्यांनी हंसावर चाल केली. त्यावेळी सर्व हंस ऐषआरामात लोळत पडले होते. आपलं कोण काय बिघडवितं या घमेंडीत ते सुखाची झोप घेत होते. पण त्या भयाण अंधाऱ्या रात्री बगळ्यांनी बेगुमानपणे त्यांच्यावर हमला केला, बाणाच्या वेगानं ते त्यांच्यावर तुटून पडले. तेव्हा ते सर्व हंस घाबरून गेले आणि जीव वाचविण्यासाठी सैरावैरा पळू लागले. परंतु त्यांची लहान लहान बालकं बिचारी कुठं पळणार ? त्यांच्यात धाव घेण्याची शक्ति ती कुठली ? एकाएकी हे काय होत आहे हेच त्या माऊल्यांना काही कळेना बगळ्यांनी त्या बालकांना गराडा घालून पकडलं. ती बालकं धाय मोकलून रडू लागली आईबापाला हाक देऊ लागली. पण त्यांच्या मदतीसाठी कोण धावणार ? कोण आपले प्राण घालवणार ? प्रत्येकाला आपापल्या जीवाची चिंता !

परंतु, त्या हंसांच्या बालकांचा तो हृदयद्रावक आक्रोश ऐकून एक म्हातारा बगळा म्हणाला, " बंधूंनो, हंसाची ही छोटी छोटी बालकं आपल्याच बालकासारखी आहेत. आईवडिलांच्या दुराचारामुळं तीहि तशी वागू लागली. त्यामुळंच आपलं जीवाभावाचं बालक आपल्याला सोडून गेलं ! जे व्हायचं ते झालं. आता या बालकांचा सूड घेणं, बदला घेणं हा काही आपला माणुसकीचा धर्म नव्हे. बदला घ्यायचा तो त्यांच्या शूर म्हणविणाऱ्या आईबापांकडून घेऊं या बालकांना सोडून दिलं पाहिजे एकानं पाप केलं याचा अर्थ दुसऱ्यानंहि करावं असं नाही. परंतु जे असं पाप करतात त्यांना धडा देणंहि आवश्यक आहे. "

म्हाताऱ्या बगळ्याची सल्ला सर्वांनी मान्य केली. त्यांनी हंसांच्या बालकांना ताब्यात घेऊन सुरक्षित ठेवले आणि मग जोरदार लढाई सुरू झाली. अनेक हंस मारले गेले, रक्ताची नदी वाहू लागली. कांहीं हंसांना बगळ्यांनी आपल्या ताब्यात घेतलं. त्या रात्री सर्वत्र भयाण वातावरण पसरलं. जसजशी रात्र वाढत गेली तसतशी भयानकताहि वाढत गेली. बगळ्यांनी बालकांना जसे संरक्षण दिले तसेच हंसींनाहि ताब्यात घेऊन सुरक्षित ठेवले होते. पण पुढे बगळे आपले काय

अनुक्रमणिका

करणार या भीतीने हंसी रात्रभर रडत होत्या. त्या पळून जाऊ नयेत म्हणून काही बगळे पहारा देत होते. रात्रीचे ते भेसूर वातावरण काळिजाचे पाणी करी. आकाशात तारे चमकत पण तेहि भीतीने इकडे तिकडे दडी मारत.

रात्रीचे बारा वाजले. इतक्यात एक तारा तुटून पडतांना आढळला. त्याच्या लख्ख प्रकाशानं संपूर्ण जंगल प्रकाशमान झालं. जेथे आपलं बालक तडफडून मेलं अगदी त्याच जागी तो तारा पडल्याचे बगळ्यांनी पाहिलं. पहाता पहाता त्या जागी एक देवदूत उभा असल्याचं आढळलं. बगळ्यांनी त्याला लवून प्रणाम केला. आशीर्वाद देत तो देवदूत त्या बगळ्यांना म्हणाला, "मी तुम्हाला प्रसन्न झालो आहे. तुम्ही हंसाची बालक नि त्यांच्या मातांचं रक्षण केलं. मागा, तुम्हाला काय हवं ते "

हात जोडून बगळे विनम्रतेनं म्हणाले "देवा, आम्ही गरीब आहोत. मोठ्या कष्टानं आम्ही आपला उदरनिर्वाह चालवितो. जाणूनबूजून आम्ही कोणाला त्रास देत नाही. तरी हे देवा, आम्हावर मोठा अन्याय होतो. आमचे रक्षण करा. आमचं बालक आम्हाला परत द्यायला लावा. आणि असे काही करा की ज्यामुळे आम्ही आपले पोट सहजतेने भरू शकू."

"ठीक" देवदूत म्हणाला, मग जेथे बगळ्याचं बालक मरण पावलं होतं तेथे त्यानं चुटकी वाजविताच ते बालक जिवंत झालं. त्याला पाहून बगळ्यांचा आनंद गगनात मावेना. त्यांनी ताब्यात ठेवलेल्या हंस, हंसी आणि त्यांच्या बालकांना मक्त केलं. तेव्हा देवदूत हंसांना म्हणाला, "तुम्ही सर्व मानस सरोवरात रहायला जा. तेथे तुम्हाला मोत्यांचा चारा मिळेल. पण तुम्ही तेथे अहिंसेचे प्रतीक बनून रहा. आपल्या आत्मज्ञानानं न्यायान्यायाची काटेकोर छाननी करीत जा. पाणीमिश्रित दुधाचं शुद्ध पाणी वेगळं व शुद्ध दूध वेगळं करण्याचं सामर्थ्य तुम्हाला प्राप्त होवो! जा."

देवदूताची आज्ञा मानून सर्व हंसांनी मानस सरोवराकडे प्रयाण केलं. नंतर देवदूत बगळ्यांना म्हणाला, "आता तुम्हाला कोणी त्रास देणार नाही. या नदीच्या पात्राकडे पहा. जेथे जेथे जल संचित राहील तेथे तेथे तुमचे खाद्य तुम्हाला प्राप्त होईल. हा, पण एक अट आहे. तुम्हाला डोळे मिटून एका पायावर उभे रहावे लागेल, तेव्हाच तुमचे खाद्य तुम्ही प्राप्त करू शकाल."

बगळ्यांनी देवदूताची अट मान्य केली. देवदूत अन्तर्धान पावले. बगळे आणि हंस यांचा झगडा कायमचा मिटला सगळीकडे शांतीचे वातावरण पसरले.

आजहि बगळे देवदूताची अट पाळत आहेत. ते डोळे मिटून नदीच्या पात्रात किंवा तळ्याच्या काठी एका पायावर उभे असलेले दिसतात आणि मग त्यांची इच्छा सफल होते.

卐

अनुक्रमणिका

विचारांचे विश्व

' साक्षी '

ज्ञाता, ज्ञेय व ज्ञान

वैदिक दर्शनशास्त्र असे सांगते की, ज्ञाता, ज्ञेय व ज्ञान, अशा तीन पदार्थांची एक ' त्रिपुटी , जीवभावी मानवाला व्यावहारिक क्षेत्रातील कसलेहि ज्ञान होताच, आकारास येते. जथे जेथे हे जीवभावी ज्ञान तेथे तेथे ही त्रिपुटी असतेच आणि उलट, जेथे जेथे या ज्ञानाचा अभाव तेथे तेथे या त्रिपुटीचाहि अभाव असतो. म्हणजे हे असे ज्ञान आहे तर त्रिपुटी आहे आणि हे ज्ञान नाही तर त्रिपुटीहि नाही. किंवहुना, ज्ञान नाही तर काहीच नाही. ज्ञान आहे म्हणूनच ' आहे ' या पदाला अर्थ आहे. ' आहे ' या पदाने होणारी, जे जसे असेल तसे, अशी जाणीव म्हणजेच ज्ञान.

ज्ञाता म्हणजे ' मी '; ज्ञेय म्हणजे माझ्याहून भिन्न व स्वतंत्र अशी दुसरी वस्तु. म्हणजे, जिला ' मी ' या पदाने मी ओळखतो ती झाली एक वस्तु; आणि जे जे ' मी नाही-ती ', ही मत्–भिन्न अशी दुसरी वस्तु. मला ' मी ' आहे हे जाणवते; ' मी–नाही ' अशी जी मत्भिन्न वस्तु, तीहि जाणवते; ' जाणवते ' म्हणजे तिचे मला ' ज्ञान ' होते. तिचे ज्ञान म्हणजे तिच्या अस्तित्वाचे ज्ञान. म्हणजे काय झाले ? ' मी ' ही एक वस्तु; ' मी–नाही '–ती, अशी मत्–भिन्न दुसरी वस्तु; आणि हिचे मला होणारे ' ज्ञान ' ही तिसरी वस्तु याचा अर्थ असा की, या तीन वस्तु परस्पराहून भिन्न झाल्या. आणि भिन्न झाल्या म्हणून, ' मी ' म्हणजे ' ज्ञान ' नव्हे; ' मी–नाही ' अशी मत्–भिन्न वस्तुहि ' ज्ञान ' नव्हे; तर ' मी ' आणि ' मी–नाही–ते ' यांना जोडणारी अशी जी तिसरी वस्तु, तिचे नाव ' ज्ञान '. म्हणून, (१) मी=ज्ञाता, (२) ' मी–नाही-ते '=ज्ञेय; आणि ३ व २ यांना जोडणारी जी तिसरी वस्तु=ज्ञान. अशी ही त्रिपुटी आहे.— (व्यावहारिक सत्तेमध्येच ही त्रिपुटी भासत असते, पारमार्थिक सत्तेत नाही, हेहि येथे ध्यानात असू द्यावे.)

' मी ' आहे; आणि मला जे जे दिसते, भासते, तेहि आहे. या दोन विधानात दोन भिन्न वस्तूंच्या अस्तित्वाची जी जाणीव, तेच ' ज्ञान ' या पदाने

ओळखले जाते म्हणजे ज्ञान म्हणजे, जे जे 'आहे' ते; केवळ असण्याची जाणीव.

ज्ञाता म्हणजे काय ?

पण एवढ्याने आपले समाधान होत नाही. 'केवळ आहे' अशी जाणीव आपल्याला स्वस्थ बसू देत नाही. 'मी आहे म्हणजे काय ? मी म्हणजे देह ? मी म्हणजे इंद्रिये ? मी म्हणजे मन ? मी म्हणजे भावना, इच्छा, वासना ?—असे किती तरी प्रश्न अंतःकरणात उभे राहतात.

त्याचप्रमाणे, 'मी–नाही–ते' काय आहे ? त्याचा माझा संबंध कशा प्रकारचा आहे ? मला अस्तित्व आहे; 'मी–नाही' असे जे जे, त्या सर्वांना अस्तित्व आहे. असेल. पण या अस्तित्वाला तरी काय **अर्थ** आहे ? अस्तित्व म्हणजे अर्थशून्यता ?—

पण **अर्थ** म्हणजे काय ? या विराट् विश्वात माझ्यासहित असंख्य वस्तु आहेत. असतील. मला त्याच्याशी काय करायचे आहे ? काही नाही ?—

मला आई आहे. ती मला हवी की नको ? **हवी**. मला वडील आहेत. ते मला हवेत की नको ? **हवेत**. मला भूक लागते. मला काही खायला–प्यायला हवे की नको ? **हवे**–हवे, हवे, हवे.—मला कितीतरी गोष्टी हव्याशा वाटतात. त्या नसतील, त्या मिळाल्या नाहीत, तर मी दुःखी होईन.

याचा '**अर्थ**' काय झाला ? मला जे जे **हवेसे वाटते** ते ते अर्थपूर्ण. आणि मला जे जे **नकोसे वाटते**, ते ते अर्थशून्य म्हणजे वस्तूंना जो माझ्यापुरता '**अर्थ**' प्राप्त होतो, तो माझ्या हव्यासामुळे. आणि माझ्या हव्यासाचा अर्थ काय ? हव्यास का वाटतो ? मला जगण्याची इच्छा आहे आणि जगण्यासाठी जे जे आवश्यक ते ते मला हवेसे वाटते. पण हे तरी खरे आहे का ? केवळ जगण्याला किती तरी थोड्या गोष्टींची आवश्यकता असते. एवढ्या किमान गोष्टी मिळाल्या तर मी संतुष्ट होईन का ? नाही, अर्थात नाही का ? कारण केवळ जगणे हा माझा हेतु नसून, सुखाने, अधिकाधिक सुखाने, अधिकाधिक सन्मानाने, अधिकाधिक वैभवाने जगणे हा माझा हेतु असतो. म्हणून सुखाची अमर्याद समृद्धि आणि दुःखाची पूर्ण निवृत्ति, हाच माझ्या जगण्याचा, जगत राहण्याचा हेतु झाला. पण हा हेतु सफल होणे शक्य आहे का ? शक्य नसले तरी मला हे **हवे** आहे. हे खास. जे हवे, जसे हवे, ज्या प्रमाणात हवे, ज्या प्रकारे हवे, ते सर्व तसेच प्राप्त होणे याचे नाव सुख. आणि याला विरोधी वा प्रतिबंधक असे जे जे, ते सर्व दुःख..

भोक्ता व कर्ता

याचा अर्थ काय झाला? 'मी' आणि 'मी-नाही-ते' यांच्यातील संबंध हा अर्थप्रधान, हेतुप्रधान, सुख-दुख प्रधान असा झाला. म्हणजे केवळ अस्तित्वरूप ज्ञान हे मला निरर्थक वाटल्यामुळे, **ज्ञाता-ज्ञेय-ज्ञान**, ही त्रिपुटी बाजूला सरली व तिचे आता **भोक्ता-भोग्य-भोग**, अशा त्रिपुटीत रूपांतर घडून आले. आणि जे जे भोग्य ते ते प्राप्त करून घेण्यासाठी मी धडपड करू लागताच, ही दुसरी त्रिपुटीहि नाहीशी होते आणि तिला '**कर्ता-कार्य-क्रिया**' असे तिसरे रूप प्राप्त होते.

याचा अर्थ काय झाला? 'मी' ही मूळ प्राथमिक वस्तु, ज्ञान, इच्छा व कृति, अशा त्रिविध रूपाची झाली. मला आरंभी माझ्या व मत्-भिन्न अशा अन्य वस्तूंच्या केवळ अस्तित्वाचे, अहेपणाचे ज्ञान होते. पण हे ज्ञान मला अर्थशून्य वाटते. आत हवेपणाची इछा 'उसळताच' हव्याशा वस्तूला 'अर्थ' प्राप्त झाल्यासारखा वाटतो. एवढेच नव्हे, तर माझ्या केवळ अहेपणाला, जगण्यालाहि 'अर्थ' प्राप्त झाल्यासारखा वाटतो. म्हणजे 'अर्थ' ही इच्छाजन्य, वासनाजन्य वस्तु झाली हा 'अर्थ' म्हणजे 'मी' नव्हे आणि 'मी-नाही' अशी ती, मला हवीशी वाटलेली, वस्तुहि नव्हे. म्हणजे 'अर्थ' ही माझ्या इच्छेची, वासनेची निर्मिति झाली.

सारांश, आरंभीचे केवळ आहेपणाचे 'ज्ञान' मारूनच 'इच्छा' उसळते; आणि ही 'इच्छा' मारूनच 'इच्छापूर्तीची 'कृति' आकारास येते. माझा 'मी-पणा' अशा रीतीने जगण्याच्या व्यापारात ज्ञान-इच्छा-कृतींच्या त्रांगड्यात अडकला जातो. यात 'ज्ञान' हे नाममात्रच, म्हणजे अस्तित्वमात्रच असते. मला माझी व मत्भिन्न अन्य वस्तूंची जाणीव, केवळ अस्तित्वाची जाणीव, करून देण्यापुरतेच ते ज्ञान मर्यादित असते. आणि ते मला निरर्थक वाटत असते पण इच्छाजन्य, वासनाजन्य हवेपणाची ऊर्मि उसळताच मला, माझ्या असण्याला, जगण्याला 'अर्थ' आल्यासारखे वाटू लागते. नाममात्र व 'अर्थशून्य' ज्ञानाच्या प्रेतावरूनच मी माझ्या वासनेच्या आहारी जातो. आणि वासनेच्या प्रेतावरूनच मी कर्माच्या जाळ्यात अडकतो. आणि सरतेशेवटी, कर्तेपणा, कर्तृत्व हेच माझ्या जीवनाला **सार्थकता** आणून देणारे ठरते.

× × ×

आपण सर्व आज, फार थोडे अपवाद वगळून, या कर्तेपणाच्या व तज्जन्य कर्तृत्वाच्या पाशात पूर्णपणे जखडले गेलो आहोत. या कर्तेपणाच्या व कर्तृत्वाच्या

अनुक्रमणिका

आवेगात ज्ञान, यथार्थज्ञान हे अर्थशून्य होऊन बसले आहे. ज्ञान, यथार्थ ज्ञान सोडून, बाकी सर्व काही आपल्या हवेपणाचा व कर्तृत्वाचा विषय झाले आहे.

कर्मचक्र

यालाच वैदिक दार्शनिक 'कर्मचक्र' असे म्हणतात. या कर्मचक्रातूनच सुख-दुःखांची अनेक आवर्तने आकारास येतात. आपल्या व अन्य वस्तूंच्या केवळ अस्तित्वाचे ज्ञान झाले व ते होताच हवेपणाची इच्छा-वासना आत उसळली, पण तिच्या पूर्तीसाठी आपण काहीच केले नाही, तर कर्मचक्र आकारासच येणार नाही. पण इच्छेचा, वासनेचा आवेग आपल्याला आवरता येत नाही, अथवा आवरावासा वाटत नाही, म्हणून कर्मचक्र सुरू होते. आणि एकदा हे कर्मचक्र सुरू झाले की, सुख-दुःखांच्या अनंत आवर्तनात गटंगळ्या खात राहण्यापलीकडे दुसरे काहीच आपल्या हाती उरत नाही हे कर्मचक्र अखंड गतिमान ठेवणारी शक्ति म्हणजे आपली इच्छा-वासना सर्व जीवांना आपल्या पाशात बद्ध करून ठेवणाऱ्या या वासनाशक्तीलाच '**माया**' वा '**ब्रह्मशक्ति**' असे नाव वेदान्त्यांनी दिले आहे. ही प्राकृतिक शक्ति आहे. तिचा आवेग प्रचंड आहे हा आवेग आवरण्याची शक्ति कोणत्याहि बद्ध जीवात नाही तिला आवरण्याचा, दाबण्याचा प्रयत्न हा मनोविकृतीतच परिणत पावतो, असा आधुनिक मानसशास्त्राचाहि निष्कर्ष आहे. वासनारूपाने प्रत्येक जीवात कृतिशालि व अधिकाधिक वेगवान् होणारी मायाशक्ति ही जीव जीवात संघर्ष घडवून आणून सर्वनाशाकडे, म्हणजे महाप्रलयाकडे नेणारी असते.

माया आणि वासना

या मायाशक्तीच्या स्वरूपाकडे दुर्लक्ष करून मानवी समाज सुधारण्याचे व नवे कल्याणमय, मंगलमय व सुखमय जग आकारास आणण्याचे सर्व प्रयत्न हे स्वप्नरंजनात्मक आहेत. पंचवार्षिक योजना इ. प्रकार हे मायाशक्तीचे नवनवीन व मोहजन्य असे विकारच होत. त्यातून मानवी कल्याण आकारास येणे, हे सर्वथैव अशक्य आहे सुख-दुःखाची अनंतश्रेणि व तज्जन्य अनंत संघर्षच त्यातून निर्माण होत राहतात.

वासनाशक्तीच्या रूपाने वावरणाऱ्या मायाशक्तीच्या मगरमिठीतून मुक्त होण्याचा काहीच मार्ग नाही का? आहे. वासनाशक्ति जितकी प्रकृतिसिद्ध तितकाच हा मार्गहि प्रकृतिसिद्धच आहे. हा मार्ग म्हणजे **ज्ञानमार्ग**.

मायाशक्तीला दुर्लक्षून वा विरोधून जे जे करण्यात येते ते ते सर्व. जीवांना मायेच्या जाळ्यात अधिकाधिक बद्ध करण्यासच कारणीभूत होते. हा प्रकृतिसिद्ध

अनुक्रमणिका

असा नियम आहे. ही अभेद्य अशी नियति आहे मायाशक्तीच्या मगरमिठीतून सुटका करून घेण्याचा एकमात्र मार्ग म्हणजे ज्ञानमार्ग. मायाशक्तीला, वासना-शक्तीला विरोधावयाचे वा निरोधावयाचे नसते, तर तिचे स्वरूप संपूर्णपणे, यथार्थपणे, केवळ समजून घ्यावयाचे असते. म्हणजेच तिचे यथार्थ ज्ञान करून घ्यावयाचे असते. असे ज्ञान करून घेणे म्हणजे तिच्या सर्व व्यापारांकडे, आदि-मध्य-अंतासहित, केवळ साक्षीपणाने पाहण्याची प्रयत्नशून्य वृत्ति, कर्मशून्यवृत्ति, स्थिर होणे. हीच मायेचे यथार्थ दर्शन घडविण्यास समर्थ ठरत असते.

कर्म हे पुरुषतंत्र

आपला 'मी–पणा' हा ज्ञान–इच्छा-कृति–युक्त असा त्रिविध रूपाचा असतो. हे त्रिविध रूप प्रकृतिसिद्ध असेच आहे. ही त्रिविधरूप प्राकृतिक शक्ति (ज्ञानशक्ति, इच्छाशक्ति व क्रियाशक्ति) म्हणजेच माया. या तीन प्राकृतिक शक्तींपैकी कर्म वा कृति बंद करणे हे आपल्या स्वाधीनचे आहे. कारण कर्म हे **'पुरुषतंत्र'** आहे. चांगले कर्म करणे, वाईट कर्म करणे अथवा भलतेच काही करणे, हे आपल्या स्वाधीनचे आहे. म्हणून 'कर्म' हे पुरुषतंत्र आहे, असे आद्य श्रीशंकराचार्य म्हणतात. म्हणून कर्म थांबविणे, हीच कर्मचक्राच्या निर्घृण नियतीतून बाहेर नेणारी पहिली पायरी होय. पण कर्म आपल्याला थांबविता येणे शक्य आहे का ? समग्र प्राकृतिक कर्म थांबविता येणे शक्य नाही, हे खरे; पण आपल्या कर्म-चक्रास, म्हणजेच पाप–पुण्यमय निर्घृण नियतीस कारणीभूत होणारे जे कर्म असते ते, समग्र प्राकृतिक कर्म नसून, केवळ वासनाजन्य-कर्म हेच असते. हे कर्म सर्वस्वी पुरुषतंत्र असे आहे वासनांना आवर घालणे कठीण असले तरी वासना उसळली असताहि तिच्या पूर्तीसाठी कसलीहि धडपड न करणे, हे आपल्या स्वाधीनचे आहे. ही वासनाजन्य कर्मप्रवृत्ति थांबवून, वासनेच्या स्वरूपाचाच वेध घेत राहणे, हे मुळीच अशक्य नाही. कारण, वासना वा इच्छा ही जितकी निसर्गदत्त आहे तितकीच शुद्ध जिज्ञासा ही देखील निसर्गदत्त अशीच वस्तु आहे. वासनेच्या स्वरूपाचे निरीक्षण वा संशोधन हे तेव्हाच शक्य होते की, जेव्हा वासनापूर्तीसाठी होणारा प्रयत्न बंद पडतो. कर्म बंद पाडायचे ते केवळ वासनापूर्तीसाठी केले जाणारे कर्म. हे जर अशक्य मानले, तर यथार्थ ज्ञान व मुक्ति हीहि अशक्यच मानावी लागेल. पण हे अशक्य नाही, असा सर्व ज्ञानवंतांचा अनुभव आहे. आणि म्हणूनच ते, **'ज्ञानादेव तु कैवल्यम्'** असा सिद्धांत सांगतात.

ज्ञान हे वस्तुतंत्र

वासनावेगाने प्रस्फुरित होणारी कर्मप्रवृत्ति आवरली की, साक्षीवृत्तीच्या देहेंद्रियप्रधान–कर्म-क्रियाशून्य, अशा ज्ञानक्रियेला प्रारंभ होतो. ही ज्ञानक्रिया

‘वस्तुतंत्र’ असते. ती पुरुषतंत्र नसते. म्हणून आपल्या दृष्टीने क्रियाशून्य अशी केवळ साक्षी. वृत्ति आणि वस्तुतंत्रात्मक अशा वस्तुबोधाच्या दृष्टीने ज्ञानप्रक्रिया, असा हा प्रकार असतो. या अशा केवळ साक्षीवृत्तीत अलिप्तपणे, असंगपणे अवस्थित होऊ लागताच, ज्ञाता-ज्ञेय-ज्ञान या प्राथमिक त्रिपुटीशी आपली जीवशक्ति तादात्म्य पावू लागते. केवळ अस्तित्वरूप व आरंभी अर्थशून्य भासणाऱ्या ज्ञानाच्या गाभ्यात आपण प्रवेश करू लागतो. ही प्राथमिक व मूलभूत त्रिपुटी, वासनेच्या आहारी जाऊन, आपण ‘अर्थशून्य’ मानून पूर्वी सोडून दिलेली होती. पण वासना आणि वासनापूर्तीचे प्रयत्न यांच्या त्याच त्या आवर्तनाची अर्थशून्यता जाणवू लागली म्हणजेच खरी जिज्ञासा आकारास येऊ लागते. सुख-दुःखमय आवर्तनात गुरफटलेल्या या आपल्या जीवनाला काही **अर्थ** आहे काय, याचा आता मूलगामी वृत्तीने शोध सुरू होतो. हा विशुद्ध जिज्ञासाजन्य शोध अविचल साक्षीवृत्तीने अखंड चालू ठेवणे, याचे नाव **ज्ञानमार्ग**. हा मार्गच आत्मदर्शन व विश्वदर्शन घडविण्यास समर्थ ठरतो, असा वेदान्तदर्शनाचा दावा आहे.

सारांश, ज्ञाता-ज्ञेय-ज्ञान या त्रिपुटीशी आपली समग्र जीवशक्ति तदाकार करून, या त्रिपुटीतील प्रत्येक पदार्थाचे स्व-स्वरूपदर्शन करून घेणे, हाच मानवी जीवनाचा परमोच्च पुरुषार्थ आहे. आणि या पुरुषार्थाला पोषक असे समाजजीवन आकारास आणणे, हाच अखंड कल्याणमय समाजरचना प्रस्थापित करण्याचा एकमात्र मार्ग आहे. समाजरचनेचे अन्य सर्व प्रकार हे आंधळे व मानवाला निर्घृण प्राकृतिक नियतीच्या व प्रलयंकारी संहाराच्या आहारी नेणारे आहेत.

卐

अनुक्रमणिका

दुसऱ्या महायुद्धानंतरचे पाश्चात्य साहित्य

स. शं. देसाई

दुसऱ्या महायुद्धानंतरच्या पाश्चात्य साहित्याचे विहंगमावलोकन केले असता त्याच्यामध्ये आमूलाग्र बदल झाल्याचे दिसून येते. उण्यापुऱ्या दोन पाव शतकामध्ये झालेली दोन जागतिक महायुद्धे, कम्युनिझम्, फॅसिझम्, आणि नाझिझम् या तीन अनियंत्रित हुकूमशाह्यांचा उदय, वर्तमानपत्रे, नियतकालिके यांचा प्रचंड पसारा आणि सिनेमा, रेडियो आणि टेलिव्हिजन या सर्वांचा पाश्चात्य साहित्यावर निश्चित असा परिणाम झालेला आहे. पाश्चात्य लोकांना आपल्या स्वातंत्र्याचा आणि व्यक्तिवादाचा मोठा अभिमान वाटतो. त्या दोन्हच्या रक्षणार्थ ते प्रसंगी आपले बलिदान करण्यास देखील मागेपुढे पाहत नाहीत. पण आजच्या पाश्चात्य लोकामध्ये ती पूर्वीची ईर्षा राहिली आहे असे वाटत नाही. आजचा पाश्चात्य मनुष्य हा कम्युनिझम आणि कम्युनिस्ट विरोध (Anti-Communism) या दोन्हींच्या संघर्षामध्ये सापडला असून, त्या संघर्षाचे प्रतिबिंब आजच्या युरोपियन साहित्यात उमटलेले दिसून येते. जो युरोपियन मनुष्य आज राजकीय दृष्टचा जागृत आहे, तो कम्युनिस्ट किंवा कम्युनिस्टविरोधक या दोन्हीपैकी कुणीतरी एक आहे.

कादंबरीचा ऱ्हास

पाश्चात्य साहित्यात कादंबरी ही नेहमी अग्रस्थानी होती. अठरावे आणि एकोणविसावे ही दोन्ही शतके कादंबरीने गाजविली. पण विसाव्या शतकामध्ये विशेषेकरून पहिल्या महायुद्धानंतर तिच्या अधःपातास सुरवात झाली. आज पाश्चात्य साहित्यात एकोणविसाव्या शतकातील कादंबरीसारखी कादंबरी लिहिली जात नाही. टीकाकारांच्या मते कादंबरीच्या अवनतीचे कारण आजच्या राजकीय परिस्थितीत आहे. आज युरोपात कादंबरीपेक्षा राजकारणावर लिहिलेल्या ग्रंथांना अधिक मागणी आहे. त्याचा पुरावा म्हणजे इंग्लंडचे भूतपूर्व पंतप्रधान मि. चर्चिल यांचा दुसऱ्या महायुद्धाचा इतिहास आणि महायुद्धातील त्यांच्या आठवणी (memoirs) होत. मि. चर्चिल यांच्या दुसऱ्या महायुद्धाच्या इतिहासाचे खंड युरोपियन साहित्यवर्तुळातील चर्चेचा आणि कुतूहलाचा एक विषय होऊन

अनुक्रमणिका

राहिला आहे. हे खंड फार महाग आहेत, पण ग्राहकांच्या त्यांच्यावर नुसत्या उड्या पडत आहेत. त्या खंडांनी मि. चर्चिल यांना उदंड कीर्ति आणि अमाप पैसा मिळवून दिला. इतकेच नव्हे, तर साहित्यातील नोबेल परितोषकहि मिळवून दिले. वास्तविक चर्चिल हे काही धंदेवाईक लेखक नाहीत. दुसऱ्या महायुद्धाचा इतिहास लिहिण्यापूर्वी त्यांनी विशेष अशी साहित्यनिर्मिति केलेली नव्हती. त्यांचे तारुण्यातील आत्मचरित्र आणि त्यांच्या घराण्यातील एक थोर पुरुष ड्यूक ऑफ 'मार्लबरो' यांचे चरित्र हे दोनच ग्रंथ तेवढे विशेष उल्लेखनीय होते. त्यांनी कादंबरी लिहिण्याचा प्रयत्न केला होता, पण तो अयशस्वी झाला. तथापि त्यांची साहित्यनिर्मिति कुठल्याहि धंदेवाईक लेखकाच्या साहित्यनिर्मितीहून अधिक आहे.

राजकीय मतप्रणालीचे माहात्म्य

पण मि. चर्चिल यांना आज जी लोकप्रियता मिळालेली आहे, ती केवळ त्यांच्या साहित्यामुळेच आहे, असे म्हणता येत नाही. युरोपातील एका विशिष्ट राजकीय मतप्रणालीचे ते अध्वर्यु आहेत. ही मतप्रणाली मान्य असलेला एक मोठा वाचकवर्ग युरोप-अमेरिकेत आहे, आणि तोच वाचकवर्ग त्यांच्या दुसऱ्या महायुद्धाच्या इतिहासाच्या खंडांचा ग्राहकहि आहे. आज कादंबरी आणि कविता हे दोन्ही साहित्यप्रकार मोठ्या कठीण अवस्थेतून जात आहेत. समाधानाची गोष्ट ही की, कादंबरीची स्थिति अद्याप अगदीच शोचनीय नाही. पण कवितेचे हाल मात्र कुत्रादेखील खात नाही. आज कवितेला कुणी स्पर्श करायलादेखील तयार नाही. एखाद्या दुसऱ्या मासिकात किंवा नियतकालिकात तिच्या वाट्याला एकादा कोपरा येत असेल तेवढाच ! कादंबरीविषयी बोलायचे झाल्यास तिला आपले अस्तित्व टिकवून ठेवण्याकरिता राजकारणाची कास धरावी लागत आहे. कारण, आज युरोपात राजकीय कादंबरीला अधिक मागणी आहे.

क्रांतिकारक बदल

कादंबरी आणि कविता ह्या दोन्हीप्रमाणेच नाटकहि आज एका स्थित्यंतरातून जात आहे. त्यालाहि आपले अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी नाना प्रकारच्या खटपटी लटपटी कराव्या लागत आहेत. पाश्चात्य साहित्य म्हटले की, त्यात सर्वच युरोपियन साहित्याचा अंतर्भाव होतो. मग त्यात रशियन साहित्यहि आलेच. राज्यक्रांतीनंतर रशियन साहित्यामध्ये क्रांतिकारक बदल झाला, त्या ठिकाणी समाजाची घडीच मुळी बदलून गेली, तेथे साहित्याची घडी टिकून राहाणे अशक्य होते. त्याचा परिणाम असा झाला की, नवीन राज्यपद्धती मान्य नसलेल्या

अनुक्रमणिका

लेखकांना आपल्या मायभूमीचा त्याग करून परदेशगमन करावे लागले. ज्यांना रशिया सोडून निघून जाणे शक्य झाले नाही, त्यांना बदलत्या परिस्थितीप्रमाणे नवीन सत्ताधाऱ्यांशी समझोता करावा लागला. तर काही लेखकांनी मुळी लेखसंन्यासच घेतला. ज्यांचे जीवन निव्वळ लेखणीवर अवलंबून होते, त्यांना कम्युनिस्ट तत्त्वप्रणालीच्या चौकटीत बसणारे साहित्य लिहावे लागले. बहुजन समाजाला शिक्षण देण्याचे आणि नवीन समाजव्यवस्थेला स्थैर्य आणण्याचे महान आणि पवित्र कार्य क्रांत्युत्तर रशियन लेखकांना करायचे होते. कला ही कलेकरिता आहे, ह्या तत्त्वाला रशियन सत्ताधाऱ्यांनी गचांडी दिली. रशियाच्या खेडोपाडी पसरलेल्या असंख्य अडाणी समाजाच्या उद्धारासाठी रशियन लेखकांना आपल्या लेखणीच्या स्वातंत्र्यावर बंधन घालून थोडा स्वार्थत्याग करायचा होता. पण असे जरी असले तरी लेनिनच्या हयातीपर्यंत रशियन लेखकांना थोडे फार स्वातंत्र्य होते. त्यांनी अमुक प्रकारचेच साहित्य लिहिले पाहिजे, अशी त्यांच्यावर सक्ति नव्हती. पण स्टॅलिनची हुकूमशाही सुरू झाल्यावर मात्र त्याने रशियन लेखकांचे स्वातंत्र्य पार हिरावून घेतले. खुद्द स्टालिन हा स्वतःच एक स्वयंभू लेखक बनला, व रशियन लेखकांकडून त्याने आपणास हवे तसे साहित्य लिहून घेण्यास सुरूवात केली. स्टालिनने उद्योगधंद्याप्रमाणे साहित्याचे कारखाने उघडले असे म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाही. त्याच्या अमदानीत रशियामध्ये एवढी साहित्यनिर्मिति झाली की, रशियन साहित्याच्या समंग्र इतिहासातदेखील तितके साहित्य निर्माण झाले नसेल. पण हे ठराविक साच्यातून बाहेर पडलेले साहित्य अगदीच निकृष्ट दर्जाचे होते, असे मात्र म्हणता येत नाही. त्या प्रचंड ढिगाऱ्यामध्ये काही उत्कृष्ट कलाकृतीहि लिहिल्या गेल्याचे पाश्चात्य टीकाकारांनी कबूल केले आहे.

रशियातील साहित्यिक

साहित्याच्या प्रचंड निर्मितीप्रमाणेच रशियन लेखकांना बरकतीचेहि दिवस आले. त्यांना आता प्रपंचाची काळजी करावी लागत नाही. लेखकांना तिकडे मानाने वागविण्यात येते. सरकार त्यांची सर्व प्रकारे काळजी घेते. असे सांगतात की, प्रथम दर्जाच्या लेखकांची राहणी तिकडे मंत्री आणि बड्या पगाराचे अधिकारी ह्यांच्या राहणीहून कोणत्याहि बाबतीत कमी नसते. रशियन लेखकांच्या ह्या सुखवस्तुपणाचा हेवा युरोपातील कंगाल लेखकांना आणि कवींना वाटल्याशिवाय राहिला असेल असे वाटत नाही. आणि वस्तुस्थिति अशी आहे की, पश्चिम युरोपातील ह्याच लेखक-कवींनी कम्युनिझम हे मानवतेला मिळालेले दैवी वरदान आहे असे सांगून त्याचे सहर्ष स्वागत केले होते. मानवतेचा उद्धार

कम्युनिझमच्या विजयामध्ये आहे अशी त्यांची अढळ श्रद्धा होती. पण स्टालिनच्या राजवटींत शुद्धीकरणाचे जे भीषण सत्र झाले त्याचा ह्या लेखक–कवींनी भयंकर धसका घेतला. त्यांचा कम्युनिझमवरील विश्वास उडत चालला. काहींनी तर त्या हत्याकांडाचा निषेध म्हणून कम्युनिस्ट पक्षाच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला व ते कम्युनिझमचे उघड विरोधक बनले. काहीजण द्विधा मनःस्थितीत दुसऱ्या महायुद्धापर्यंत राहिले. पण रशियन फौजांनी हंगेरीतील स्वातंत्र्याचा उठाव आपल्या जबरदस्त टाचाखाली चिरडून टाकला तेव्हा ह्या लेखक-कवींचे हृदय शतशः विदीर्ण झाले. बिचारा युरोपियन कवि ! आज त्याच्यासारखा हताश आणि भ्रमनिरास झालेला मानवी प्राणी जगाच्या पाठीवर अन्यत्र कुठे सापडायचा नाही.

हुकुमशाहीचे दुष्परिणाम

हिट्लर आणि मुसोलिनी ह्या दोघांच्या हुकुमशाहीत जर्मनी आणि इटाली ह्या दोन्ही देशांत उल्लेखनीय अशी साहित्यनिर्मिति झाली नाही. रशियन राज्यक्रांतीमध्ये रशियन लेखकांची जी परवड झाली, तीच परवड हिटलर मुसोलिनीच्या अमदानीत जर्मन आणि इटालियन लेखकांची झाली. जर्मनीत नाझी राजवट सुरू झाल्यावर बहुतेक सर्व नामवंत साहित्यिक परागंदा झाले. हॅन्स फालाडा (Hans Fallada) हा एकच मोठा लेखक तेवढा मागे राहिला पण त्याचेहि जर्मनीतील अस्तित्व नाझींना सहन न झाल्याने त्यांनी अखेर त्याला खुनाच्या आरोपावरून तुरुंगात टाकले. बिचारा फालाडा ! आपली मायभूमि सोडून पळून न गेल्याबद्दलची शिक्षा त्याला पुरेपूर भोगावी लागली. अखेर दोस्त फौजांनी जर्मनीत प्रवेश केल्यावर त्याची मुक्तता झाली. पण तदनंतर तो फार काळ जिवंत राहिला नाही. त्याची The Drinker ही कादंबरी त्याच्या मृत्यूनंतर प्रकाशित झाली. तुरुंगात असताना त्याने ती 'कोड' मध्ये लिहिली होती. जर्मन लेखकांनी श्रेष्ठ 'नॉर्डिक' अथवा 'आर्यन' वंशाचे गुणगान करण्यापलीकडे मौलिक अशी साहित्यनिर्मिति केली नाही. त्यांचा असा दावा होता की आर्यवंशी जर्मन लोक हे फ्रेंचांसारख्या कनिष्ठ लॅटिनवंशी लोकांवर राज्य करण्यासाठी जन्मास आले आहेत.

नाझी जर्मनीचा पाडाव झाल्यावर रशियामध्ये स्टालिनच्या अमदानीत नाझींच्या वर्णश्रेष्ठत्वासारखाच एक विचारप्रवाह सुरू झाला. स्टालिनची अशी समजूत होती की जर्मनीचा पाडाव केला तो रशियन जनतेने आपल्या एकजुटीच्या बळावर. साम्यवादी जनतेची ती एकजूट अढळ आणि अभेद राहिली तर ती भांडवलशाही राष्ट्रांचा पराभव करून जगामध्ये सर्वत्र समतेचे राज्य प्रस्थापित

केल्यावाचून राहणार नाही, ही त्याची महत्त्वाकांक्षा होती. पण स्टालिनची ही विचारसरणी नवीन आहे असे मात्र म्हणता येत नाही. रशियामध्ये कम्युनिस्ट राज्यक्रांति झाल्यापासून तिथल्या नवीन सत्ताधाऱ्यांना विश्वसमाजवादाची स्वप्नें पडू लागली होती. वर्तमानपत्रे तर त्यांच्या हाताशी होतीच. पण कला, साहित्य, नाटक, सिनेमा, फार कशाला संगीतालादेखील त्यांनी आपल्या नवीन तत्त्वज्ञानाच्या प्रचारासाठी राबविले होते. कला आणि साहित्यसृष्टीत त्यांनी एका नवीन संप्रदायाची स्थापना केली होती व त्याला समाजवादी वास्तववाद (Socialist Realism) हे नाव दिले होते. प्रत्येक व्यक्तीने आपापल्या परी समाजवादी राष्ट्राची त्याच्या उच्च तत्त्वांचा प्रसार करून सेवा बजावणे आवश्यक होते. कारण ते कार्य उदात्त आणि पवित्र होते. जो कुणी ह्या कामी अंगचोरपणा करीत होता, तो दुष्ट (villainous) आणि रशियन जनतेचा शत्रु होता.

पण वरील तत्त्वज्ञानाने मूर्त स्वरूप धारण करण्यापूर्वीच हिटलरने रशियावर स्वारी केली. सामायिक शत्रूचा पराभव करण्यासाठी स्टालिनला दोस्त राष्ट्रांशी मैत्री करावी लागली. त्यामुळे साहजिक रशियाची द्वारें त्याला दोस्तांना खुली करणे भाग पडले. त्या द्वारांतून रशियामध्ये पाश्चात्य देशातून जें लष्करी साहित्य आणि अन्नाची बेगमी गेली, त्यांच्याबरोबरच पाश्चात्य देशांतील बुर्ज्वा कल्पनाहि तिकडे गेल्या. त्या कल्पनांवर निर्बंध घालणे स्टालिनला अशक्य झालें. कारण तसे केल्याने त्याच्यावर दोस्तांची खप्पा मर्जी होण्याची भीति होती. पण युद्धसमाप्तीनंतर सैल झालेले निर्बंध पुन: कडक करण्यात आले आणि त्या कल्पनांचा पुरस्कार करणाऱ्या लेखकांचे आणि टीकाकारांचे शुद्धीकरण सुरू झाले. त्यांची प्रथम कानउघाडणी करण्यात आली. पण ज्यांनी त्या कानउघाडणीकडे दुर्लक्ष केले त्यांना जीवन अशक्य करून सोडण्यात आले. ज्या देशात वर्तमानपत्रे आणि प्रकाशन संस्था सरकारनियंत्रित असतात तेथे कुठल्याहि मातबर लेखकाची शासनसंस्था कोंडी करू शकते.

स्टालिनच्या मृत्यूनंतर

स्टालिनच्या मृत्यूपर्यंत पुष्कळशा नामवंत लेखकांना रशियामध्ये अपमानास्पद जीवन जगावे लागले. आपल्या इच्छेविरुद्ध वागणाऱ्या लेखकांचा काटा काढणे हा स्टालिनच्या हातचा नुसता मळ होता. स्टालिनच्या रोषास बळी पडलेले

अनुक्रमणिका

कित्येक लेखक रशियातून अचानकपणे बेपत्ता झाले. त्यांचे काय झाले ते कुणालाच कळले नाही. पण त्यांच्या मृत्यूनंतर नवीन सत्ताधाऱ्यांनी लेखकांवरील निर्बंध थोडे सैल केले. त्याची संधि साधून बऱ्याच लेखकांनी आपल्या कोंडमाऱ्याला वाट मोकळी करून दिली. स्टालिन-प्राईझ मिळणारा आणि रशियाचा प्रति टॉल्स्टॉय म्हणून समजला जाणारा महान लेखक **इल्या एयरेनबर्ग** (Illya Eherenburg) ह्याची *The Thaw* ही रूपकात्मक कादंबरी *Season of the year* ही पानोवा (Panova) ह्या लेखिकेची कादंबरी आणि डयुडेनस्टयू (Dudentsew) ह्या लेखकाची *Not by Bread Alone* ह्या कादंबऱ्या स्टालिनच्या मृत्यूनंतर प्रसिद्ध झाल्या. विशेषतः Not by bread Alone ह्या कादंबरीने केवळ रशियामध्येच नव्हे तर सबंध जगात खळबळ माजविली. त्यामुळे रशियन नेते भयंकर अस्वस्थ होऊन गेले व त्यांनी 'डयूडेनस्टयू'ला अशी तंबी दिली की, यापुढे Not by Bread Alone सारख्या कादंबऱ्या सरकार सहन करणार नाही. ह्या कादंबरीमध्ये एक वैज्ञानिक आणि त्याला नामशेष करण्यासाठी प्रत्यक्ष शासनसंस्थेची मदत घेणारा त्याचा प्रतिस्पर्धी ह्या दोघामधील झगडयाचे चित्र रेखाटण्यात आले आहे. ही कादंबरी रशियामध्ये इतकी लोकप्रिय झाली की, विद्यार्थ्यांनी आणि बुद्धिवाद्यांनी सभा भरवून त्या कादंबरीच्या लेखकाचा गौरव केला.

पास्टरनॅक प्रकरण

या कादंबरीनंतर रशियाबाहेर खळबळ माजविणारी दुसरी कादंबरी म्हणजे **डॉ. झिवागो** ही होय. ही कादंबरी रशियामध्ये प्रकाशित न होता प्रथम इटालीमध्ये प्रकाशित झाली. एका नियतकालिकाच्या संपादकाने ती आपल्या नियतकालिकात प्रकाशित करण्यास नकार दिला होता. एका कम्युनिस्ट इटालियन प्रकाशकाने तिच्या भाषांतराची एक प्रत आपणाबरोबर इटालीमध्ये आणली. तो इटालियन प्रकाशक नंतर कम्युनिस्टविरोधक बनला, व इटालियन कम्युनिस्ट पक्षाची आणि खुद्द लेखकाची हरकत असतानाहि त्याने ती प्रकाशित केली. ही कादंबरी प्रकाशित झाल्यावर तिचा लेखक **बॉरिस पास्टर्नाक** ह्याच्या विरुद्ध रशियामध्ये प्रचंड वादळ उठले. रशियन लेखकसंघाने सभा भरवून पास्टर्नाकचा कडाडून निषेध केला, इतकेच नव्हे तर त्याला नोबेल

पारितोषिक स्वीकारण्यासाठी स्वीडनला जाण्यास सरकारने पासपोर्ट देऊ नये, अशीहि सूचना केली. बिचारा पास्टर्नाक ! आपल्याच व्यवसायबंधूकडून झालेला निषेध पाहून त्याची काय अवस्था झाली असेल, त्याची कल्पनाच केलेली बरी. रशियन सरकारने त्याला स्वीडनला जाण्यास प्रतिबंध केला नाही हे जरी खरे असले, तरी बलाढ्य अशा ' रशियन रायटर्स गिल्ड 'च्या दडपणाला वळी पडून त्याला नोबेल पारितोषिकासारखा बहुमान परत करणे भाग पडले.

पाश्चात्य जगातील नवे साहित्य

दुसऱ्या महायुद्धानंतरच्या पाश्चात्य साहित्याचे हे ओझरते चित्रण आंग्लो-साक्सन आणि फ्रेंच साहित्यासंबंधी चार शब्द लिहिल्याशिवाय पूर्ण होणार नाही. आज पश्चिम युरोपात राजकीय कादंबरी किंवा राजकारणावर लिहिलेले अन्य लेखन यांना जरी प्राधान्य असले, तरी कुठल्याच प्रकारच्या राजकीय तत्त्वज्ञानाचा अभिमान न बाळगता स्वतंत्र लेखन करणारे मोठे लेखकहि आहेत. उदाहरणार्थ, **आल्डस हक्स्ले, ग्रॅहम् ग्रीन, एव्हिलिन वॉघ्**, हे आंग्ल कादंबरीकार तात्त्विक आणि वैचारिक कादंबरी लिहीत आहेत. **चार्लस मॉर्गन** हा राजकारण-विशिष्ट कादंबऱ्या लिहिणारा आंग्ल लेखक नुकताच मरण पावला. **टी. एस्. इलिएट** हा कवि आज मॉडर्न, इंग्रजी कवींचा नेता म्हणून समजला जातो. फ्रान्समध्ये आज अस्तित्ववादी (Existencialist) साहित्य विपुल प्रमाणात लिहिले जात आहे. **ज्यां पॉल सार्त्र, जां आनुई** हा महान नाटककार, **आल्बेर्न काम्यु** (हा नुकताच मोटार अपघातात मरण पावला.) हा नोबेल प्राईझ विनर लेखक, आणि बरेच इतर लेखक अस्तित्ववादी म्हणून ओळखले जातात. हे सर्व लेखक व्यक्तिवादी असून राजकारणापासून अलिप्त आहेत.

राजकीय साहित्य आणि अस्तित्ववादी साहित्य ही आजच्या पाश्चात्य साहित्याची दोन टोके आहेत. या दोन टोकांमध्ये परंपरावादी आंग्लो-साक्सन लेखक उभा आहे. तो आपल्या परंपरेला चिकटून आहे, आणि त्या परंपरेच्या चौकटीत बसणारे साहित्य लिहीत आहे. ते साहित्य वैयक्तिक अनुभवावर आधारलेले वास्तववादी साहित्य आहे. ते जसे आनंदपर्यवसायी आहे तसेच शोकपर्यवसायीहि आहे.

卐

पत्रव्यवहार

श्रीज्ञानेश्वरप्रसन्न काशी

१७-३-६०

स. न. वि. वि.

'युगवाणी'च्या मार्च १९६० च्या अंकातील श्री. नी. र. वऱ्हाडपांडे यांचा 'कालिदास आणि शेक्सपियर' हा लेख वाचला. त्यातील तपशिलाबाबतहि मतभेद व्यक्त करता येईल. पण मला मुख्यत: येथे त्यामागील विचारसरणीची अनिष्टता सूचित करावयाची आहे.

अनेक समीक्षकांनी कालिदास व शेक्सपियर यांची तुलना करून कालिदासाला डावे ठरविले आहे, हे शल्य मनात बाळगून लेखकाने प्रस्तुत लेख लिहिलेला दिसतो. एरवी कविकुलगुरूची थोरवी सिद्ध करण्यापायी त्याला शेक्सपियरचे एवढे धिंडवडे काढण्याची गरज पडली नसती.

थोर कलावंतांची तुलना अप्रस्तुत असते याची जाणीव असूनहि श्री. वऱ्हाडपांडे यांनी तिचाच अवलंब करावा याचे नवल वाटते. चुकीचा युक्तिवाद चुकीच्या रीतीने खोडल्यासारखा हा प्रकार आहे. 'काटयाने काटा काढणे' व्यवहारात शोभेल; साहित्यसमीक्षेत नाही, हे काय सांगायला हवे? गंमत ही की येथे एका तर्कशास्त्रपारंगत विद्वानाने तर्कदुष्ट पद्धतीचा अवलंब केला आहे!

खरे तर अशी विचारपद्धति कशी सदोष आहे हे दाखवून नंतर स्वतंत्र रीतीने कालिदासाची थोरवी स्पष्ट करणे इष्ट ठरले असते. कालिदासाची महत्ता स्पष्ट करण्याकरिता बिचाऱ्या शेक्सपियरचा बळी का?...या दुष्ट वर्तुळाचा भेद घेतल्याशिवाय इलाज नाही. दोन महाकवींच्या गुणदोषांची केवळ बेरीज वजाबाकी करून त्यांचे श्रेष्ठ कनिष्ठत्व ठरविता येत नाही. तौलनिक विवेचनालाहि महत्त्व आहे, पण ते अशा संकुचित भूमिकेवरून नव्हे.

वास्तविक अजून तरी अंतिम व सर्वमान्य साहित्यनिकष आपल्या हाती आलेले नाहीत; व नजिकच्या भविष्यकाळात ते येतील किंवा नाही याची

वानवाच आहे. म्हणून कलास्वाद व कलामूल्ये यांच्यासंबंधी नेहमीच फार जपून बोलावे लागते. विशिष्ट संस्कृति व विशिष्ट मनोवृत्ति विचारात घेऊन परमत-सहिष्णुता धारण करावी लागते. दुर्दैव हे की श्री. वन्हाडपांडे यांच्याजवळ (हि) तिचा अभाव दिसतो.

कालिदास व शेक्सपियर दोघेहि असाधारण प्रतिभेचे महाकवि. आम्ही मात्र झिरझिरीत जीवनमूल्ये व वाङ्मयीन मूल्ये यांच्या बुरख्याआडून संकुचित देशाभिमान व भाषाभिमान यांनी प्रेरित होऊन अभिजात काव्याची नालस्ती करतो; आपल्या रसिकतेचे पितळ उघडे करतो.

मी अगोदरच सांगितले की माझा आक्षेप आहे तो लेखनामागील संकुचित विचारसरणीवर; कालिदास किंवा श्री. नी. र. वन्हाडपांडे यांच्यावर नव्हे. व्यक्तिशः मला लेखकाबद्दल आदर आहे आणि कालिदास व शेक्सपियर या दोघांचेहि निवडक साहित्य नितांत प्रिय आहे. कळावे.

आपला

द. भि. कुळकर्णी

वि. सा. संघाला मिळालेल्या देणग्या

गेल्या महिन्यात पुढील दात्यांनी वि. सा. संघाला देणगी दिली आहे.

१. श्री. वि. ना. अळेकर, नागपूर यांचेकडून दुर्मिळ ७५ ग्रंथ.

२. श्री. प. बा. गानू, नागपूर यांचेकडून पुरुषार्थ मासिकांचे दुर्मिळ १९९ अंक.

३. श्री. बाबुराव चिमोटे, नागपूर यांजकडून यांनी वि. सा. संघाच्या नाट्य-समितीकरिता रु. १३० ची देणगी.

वि. सा. संघ वरील सर्व देणगीदारांचा अत्यंत आभारी आहे.

卐

अनुक्रमणिका

संघवार्ता

प्रा. श्री. गो. काशीकर
सरचिटणीस, वि. सा. संघ, याजकडून

कार्यकारी मंडळाच्या दोन सभा

वि. सा. संघाच्या केंद्रीय कार्यकारी मंडळाची ७ वी सभा रविवार दि. १०–४–३० रोजी सकाळी ८-३० वाजता संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांचे अध्यक्षतेखाली भरली. सभेत पुढील कार्यवाही झाली.

१. मागील सभेचा आणि १९५९–६० चा वार्षिक अहवाल मंजूर करण्यात आले.

२. १९५९–६० चा वार्षिक खर्चाचा अहवाल मंजूर आणि नवीन वर्षाच्या अंदाजपत्रकाचा विचार करण्यात आला.

३. निरनिराळ्या समित्यांची निवड पुढीलप्रमाणे करण्यात आली.

(१) **युगवाणी संपादक मंडळ**—संपादक-श्री. पु. य. देशपांडे; सभासद-श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे, प्रा. प्र. वा. ऊर्ध्वरेषे.

(२) **परीक्षा समिति**—संचालक-प्रा. तु. वि. गेडाम. सभासद-श्री, तु. ना. काटकर, सौ. उषाताई कोलते, प्रा. मा. ल. व्यवहारे, श्री. द. शं. फडके, सौ. कमलिनी पागे, प्रा. सुरेश म. डोळके, श्री. म. न. अंजीकर, श्री. के. ना. काटपाताळ.

(३) **अर्थ आणि निविदा समिति**—आमंत्रक-कु. ताराबाई प्रधान. सभासद- श्री. गो. स. देहाडराय, श्री. पु. य. देशपांडे.

(४) **सांस्कृतिक कार्यक्रम समिति**—आमंत्रक-श्री. य. गो. मालोदे, सभासद-श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, श्री. प्र. दे. कोलते, प्रा. सौ. ताराबाई शास्त्री,

(५) **गडकरी स्मारक समिति**—आमंत्रक श्री. र. वि. कुळकर्णी. सभासद—श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, कु. ताराबाई प्रधान, श्री. य. गो. मालोदे, श्री. पां. बा. गडकरी, श्री. प्रभाकर गडकरी, श्री. यादवराव उपाध्ये (सावनेर)

(६) **साहित्य सहकार समिति**—आमंत्रक प्रा. सुरेश म. डोळके. सभासद–प्रा. व. कृ. वऱ्हाडपांडे, प्रा. श्री. मा. कुळकर्णी, प्रा. भ. श्री. पंडित.

(७) **ग्रंथालय समिति**—आमंत्रक-श्री. गो. स. देहाडराय. सभासद श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, श्री. गो. रा. दोडके, श्री. ग. नी. भवाळकर, श्री. पां. श्री. फडके, श्री. ह. मा. उपाध्ये, श्री. वि. ना. अळेकर, प्रा. भा. ल. भांबूरकर.

(८) **ग्रंथप्रकाशन समिति**—आमंत्रक–प्रा. श्री. गो. काशीकर. सभासद–श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, प्रा. डॉ. वि. भि. कोलते, प्रा. डॉ. ग. त्र्यं. देशपांडे.

(९) **नाट्यसमिति**—आमंत्रक–श्री. बाबुराव चिमोटे सभासद–श्री. सौ. सुमतीबाई घनवटे, श्री. शं. बा. शास्त्री, श्री. राजाभाऊ पाठक, श्री. मा. नी. गलगलीकर, श्री. य. गो. मालोदे, श्री. अ. त्र्यं. कोठेकर, श्री. शंकरराव कुळकर्णी, श्री. सखारामपंत जोशी.

(१०) **कै. न्या. मू. रानडे आंतरमहाविद्यालयीन वादस्पर्धा समिति**—आमंत्रक-प्रा. भा. ल. भांबूरकर. सभासद–श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे.

या प्रत्येक समितीवर अध्यक्ष, उपाध्यक्ष, सरचिटणीस व कोषाध्यक्ष हे पदसिद्ध सदस्य म्हणून राहतील. तसेच वरील शिवाय दोन सभासद नेमण्याचा अध्यक्षांना अधिकार राहील.

४. सावनेर शाखेतर्फे कै. राम गणेश गडकरी यांची समाधि बांधण्याच्या योजनेकरिता रु. २५१ किंवा एकूण खर्चाच्या निम्मे ह्यांपैकी जी रकम कमी असेल ती अनुदान देण्यास संमति देण्यात आली.

५. प्रा. श्री. गो. काशीकर यांच्या हितचिंतक होण्याबाबतच्या अर्जाला मंजुरी देण्यात आली.

६. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे विषय म्हणून पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली.

(अ) प्रकाशन संस्था म्हणून वि. सा. संघाचे नाव नागपूर शिक्षण मंडळाकडे नोंदवावे असे ठरविण्यात आले.

(आ) रंजनकलामंदिराच्या दि. ९–४–६० च्या पत्राचा विचार होऊन कै. नानासाहेब जोग स्मृतिदिनाचा कार्यक्रम रंजन कला मंदिराच्या मदतीने करावा, असे ठरले.

अनुक्रमणिका

(इ) चांदा शाखेची निवडणूक घडवून आणण्याकरिता प्रा. तु. वि. गेडाम यांना निर्वाचनाधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले.

दुसरी सभा —

दि. २३-४-६० रोजी कार्यकारी मंडळाची ८ वी सभा झाली. सभेत पुढील कार्यवाही झाली.

१. मागील सभेचा अहवाल आणि १९५९-६० चे अधिकृत हिशेब तपासनीसांनी तपासलेले हिशेब सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

२. १९६०-६१ सालाकरिता २०½ दिवस कार्यालयीन सुट्या मंजूर करण्यात आल्या.

संघस्थापना दिनाबाबत कविभूषण श्री. अण्णासाहेब खापर्डे यांचे पत्राचा विचार करण्यात येऊन दरवर्षी मकरसंक्रांतीचे दिवशी संघस्थापनादिन साजरा करावा, असे ठरले.

४. यंदा शिवजयंती उत्सव साजरा करण्याचे ठरले.

५. श्रीमंत पु. वा. काळेसाहेब यांनी वि. सा. संघाला संदर्भ ग्रंथालयासाठी २३,००० रुपयाची देणगी देण्यासंबंधी पाठविलेल्या पत्राचा विचार करून ही देणगी सहर्ष व आभारपूर्वक स्वीकारावी असे ठरले.

६. साहित्य संस्था-संघीकरणाबाबत विचारविनिमय करण्यात आला व हा प्रश्न आगामी कार्यकारी मंडळापुढे व तदनंतर साधारणसभेपुढे ठेवण्यात यावा असे ठरले.

७. वि. सा. संघाच्या प्रकाशनांच्या विक्रीची योजना ग्रंथालय समितीकडे सोपविण्यात आली.

वार्षिक साधारण सभा—

वार्षिक साधारणसभा दि. २४-४-१९६० रोजी संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांचे अध्यक्षतेखाली, दुपारी २ वाजता गणपूर्तीच्या अभावी स्थगित होऊन, २-३० वाजता भरली.

त्या सभेत मागील सभेचा अहवाल मंजूर करण्यात आला. गतवर्षीचे कार्यवृत्त, गतवर्षीचे हिशेबतपासनीसांनी तपासलेले अधिकृतहिशेब आणि १९१६०-६१ सालचे अंदाजपत्रक सभेपुढे सादर करण्यात आले. यावर साधकबाधक चर्चा होऊन मान्यता देण्यात आली. १९६०-६१ सालाकरिता अधिकृत हिशेब तपासनीस म्हणून श्री. महेश्वर गद्रे व कं. यांची नियुक्ति करण्यात आली.

★ ★

अनुक्रमणिका

सांस्कृतिक कार्यक्रम समिति

श्रीगणेश व्याख्यानमाला

दि. २०, २१ व २२ एप्रिल १९६० रोजी पहिली श्रीगणेश व्याख्यानमाला पार पडली. या व्याख्यानमालेकरिता वेदमूर्ति पं. श्री. दा. सातवळेकर यांना पाचारण करण्यात आले होते. त्यांनी "भारतीय संस्कृतीचे खरे स्वरूप कसे होते?" "तिचे विद्यमान स्वरूप कसे आहे?" "आणि हल्लीच्या काळच्या दृष्टीने योग्य असे भारतीय संस्कृतीचे आदर्श स्वरूप कसे असावयास पाहिजे?" या विषयावर तीन व्याख्याने दिली. ह्या कार्यक्रमाला तिकिटे ठेवण्यात आली नसून पेट्या ठेवण्यात आल्या होत्या. व श्रोत्यांनी स्वखुषीने रक्कम टाकावी अशी योजना होती.

दि. २४-४-६० रोजी सायंकाळी ६-३० वाजता वेदमूर्ति पं. श्री. दा. सातवळेकर यांच्या सन्मानार्थ चहापानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या समारंभाला कार्यकारी मंडळातील सभासद आणि निमंत्रित पाहुणे उपस्थित होते.

वि. सा संघाचे नवीन हितचिंतक-सभासद

१. प्रा. श्री. गो. काशीकर, नागपूर २५० रु.

* *

आजीव सभासद

१. श्री. शंकर बाळाजी शास्त्री, नागपूर ५० रु.
२. प्रा. सौ. ताराबाई शास्त्री, नागपूर ५० रु.

* *

अनुदान—

यावर्षी वि. सा. संघाला मुंबई शासनाकडून पुढीलप्रमाणे अनुदान मिळाले.
१. रु. ७५०० चे वार्षिक अनुदान.
२. नाट्यसमितीकरिता रु. ३००० चे अनुदान.
३. साहित्यसंमेलन--सावरगावडुकरे करिता रु. ५०० चे अनुदान.

मुंबई शासनाने वरील अनुदान दिल्याबद्दल वि. सा. संघ अत्यंत आभारी आहे.

卐

विदर्भ साहित्य संघ : परीक्षा समिति

फेब्रुवारी १९६० च्या

परीक्षांचा निकाल

दिनांक १३ आणि १४ फेब्रुवारी १९६० रोजी झालेल्या परीक्षांचा निकाल पुढीलप्रमाणे घोषित करण्यात येत आहे.

साहित्य स्नातक, साहित्य परिचित, साहित्य विनीत, मराठी प्रारंभ आणि मराठी प्रवेश ह्या परीक्षांना २५ केंद्रातून परीक्षार्थी परीक्षेस बसले होते.

वि. सा. संघ, नागपूर १ ता. २५-४-१९६०	तु. वि गेडाम संचालक, परीक्षा समिति

साहित्य स्नातक

क्रमांक	नाव	श्रेणी	क्रमांक	नाव	श्रेणी
२	रा. गो. खरे	३	६	ल. बा. नेरकर	३
३	ना. ना. शेगोकार	२	८	भ. बा ठाकरे	२
४	ना. रे. कुळकर्णी	३	१०	सौ. मंदाकिनी बा. भृगुवार	३
५	स. ग. वढिया	३			

साहित्य परिचित

क्रमांक	नाव	श्रेणी	क्रमांक	नाव	श्रेणी
१	गो. ता. मून	३	१५	प्र. सी. राजगुरु	३
२	प्र. न. टिकले	२	१७	ग. रा. शेवाळे	३
३	प्र. ना देशमुख	२	१८	य. ल. श्रीखंडे	३
६	वि. बा. सरतावे	३	१९	वि. कृ. देशकर	३
८	सू. ब. वाघमारे	२	२८	आ. मो. गुग्मुळे	२
९	या. सी. आहाटे	२	२९	सं. मा. बोडखे	३
११	डॉ. ना. न. लड्ढा	२			

साहित्य विनीत

क्रमांक	नाव	श्रेणी	क्रमांक	नाव	श्रेणी
२	कु. रमाकांता गो. मालधुरे	३	५३	न. टि. वरुडकर	३
४	रा. ब. गोंडसे	३	५४	श्या. जि. पालीवाल	२
११	दे. भ. गाडगे	३	५५	मो. म. दुहिजोड	३
१३	र. वि. साळंवे	३	५८	शां. मा. हरणे	२
१४	रा. गु. वानखडे	३	६१	कु. कुसुम शं. तायडे	३
१५	शं. शि. लुटे	३	६५	मो. ग. गोडबोले	३
१६	ग. शं. दवाडे	३	६६	आ. सी. कुंथे	२
१७	भा आ. आवारे	३	६७	उ. फ. पाटील	३
१८	अ. मो. येरणे	३	६८	कृ. गो. निर्मळ	३
१९	अ. रा. वाघमारे	३	६९	म. बा. खोरगडे	२
२०	शे. ल. दुबे	३	७०	रा. दे. वंड	३
२१	गो. ज्ञा. मन्वरे	३	७१	वि. आ. खोरगडे	३
२३	दे. वि. होटे	३	७२	सु. खे. गुलघे	२
२४	बा. चं. रावूत	३	७४	ह. वा. धकाते	३
२५	मा. गो. पांडे	३	७६	कु. नलिनी मा. मोहोड	२
२६	प्र. गु. कोरडे	३	७७	,, कमल मा. पाटील	३
२७	भी. सू. पांचघरे	३	७८	,, प्रमिला रा. वोन्डे	३
२८	र. उ. धोटे	३	८०	,, विमल ग. देशमुख	३
३२	म. ना. वद्रे	३	८१	,, शकुंतला सी. बोंडे	३
३३	व. पुं. राऊत	२	८२	,, छबू भी. इंगोले	३
३७	ना. गो. शेरेकार	३	८३	,, शकुंतला भ. काळे	३
३८	सु. भ. शेरेकार	३	८४	दि. शा. ठाकरे	३
३९	वि. प. कोरडे	३	८५	रा. दौ. ठाकरे	३
४३	शं. ना. कायरकर	२	८६	वि. ना. चौधरी	३
४४	द. वा. लोहकरे	३	८९	बा. व्यं. मेश्राम	३
४५	शि. का. दानव	३	९०	भा. पु. गोंढाणे	३
४८	ल. या. नैताम	३	९१	वै. रा. अर्डक	२
४९	रा. म. कांवळे	२	९२	का. ल. वासनकर	३
५०	त्र्यं. हृ. खडे	३	९३	का. शि. इंगोले	३
५१	त्र्यं. धो. वाणे	३	९४	ध. गो. हुमने	३

अनुक्रमणिका

क्रमांक	नाव	श्रेणी	क्रमांक	नाव	श्रेणी
९५	जा. गु. कराळे	३	११२	श्रीमती लीलाबाई भगत	३
९६	दे. रा. काळे	३	११३	श्री. कि. श्रीखंडे	३
९७	आ. ना. साऊरकर	२	११४	उ. आ. ढवाले	३
९८	भ. मा. मेश्राम	२	११७	घ. शा. चौधरी	३
१००	ज. ना. सरोदे	३	११९	रा. गं. रामेलवार	३
१०२	ना. चं. काळे	३	१२१	कु. मालती पं. देशमुख	३
१०३	पुं. मो. चऱ्हाटे	२	१२२	वा. उ. देशमुख	३
१२७	कि. ब्रा. तायडे	३	१२३	रा. म. चाफले	२
१०४	म. द. ठाकरे	३	१२४	चं. गों. पाचेकर	२
१०५	म. ना. दळवी	३	१२५	बा. खु. वाइन्देशकर	३
१०६	कु. मंदा रा. जोशी	३	१३२	शेखइस्माईल शेखहबीब	३

मराठी प्रारंभ

क्रमांक	नाव	श्रेणी	क्रमांक	नाव	श्रेणी
१	कु. चंद्रकला वि. घोटे	३	२२	सुं. म. राठोड	३
४	कु. शशिकला पुं. बद्रे	३	२३	क. सा. राठोड	३
५	सु. गो. जावूरकर	३	२५	द. म. वंले	३
६	रा. रा. शिंगणजोडे	२	२६	अ. ब. भनारकर	३
७	प्र. ह. माळधुरे	२	२७	ई. स. ढोले	३
८	शां. द. तितूरमारे	२	२८	शो. पा. पाटील	२
९	जा. रा. मात्कर	३	२९	कृ. श्री. शहापुरे	३
१०	व. वि. आखरे	३	३०	आ. सा. कबाडे	३
१२	मा. रा. डाफे	३	३१	म. सी. शिंदे	२
१३	म. रा मालधुरे	२	३३	जि. भा. दत्तवाडे	२
१४	गु. वि. ईसळ	३	३४	कु. तारा गो. गद्रे	२
१५	रा. स. कोठेकर	३	३५	कु. अरुणा गो. याज्ञिक	
१६	खु. गु. सुकळकार	३	३६	कु. पुष्पा मा. नामपेल्लीवार	३
१७	प. मो. गुल्हाने	३	३८	मु. रा. तिवारी	३
१८	रा. जा. खंडाटे	३	३९	घ. सु. बेंडले	२
१९	पां. अ. भालेराव	३	४०	म. ल. चिवंडे	३
२१	स. बा. चव्हाण	३	४२	स. तु. डाबेराव	३

अनुक्रमणिका

क्रमांक	नाव	श्रेणी
४३	शं. दौ. टापरे	३
४४	प्र. शं. पांडे	२
४५	कि. वि. हागे	३
४६	शा. न. ढगे	२
४७	शा. कि. काळे	३
४८	कि. ना. शेगोकार	२
४९	वि. भि. ढोले	२
५२	मो. स. बान्हेरकार	२
५४	दे. तु. ढोले	३
५५	वि. शं. ढोले	२
५६	कु. पुष्पा रे. कुळकर्णी	३
५७	मा. रा. सांगळे	३
५८	प्र. ल. सांगळे	३
६०	ज. तु. काळुसे	३
६१	ज. हा. सांगळे	३
६२	त्र्यं. वा. हरणे	३
६३	दे. तु. घुगे	३
६५	ना. ल. ठाकरे	३
६७	प. सो. तायडे	३
६९	शेखवजीर शेखपिरु कुरेशी	३
७४	कु. सुवा व. देवघरे	२
७६	रा. गु. ढोवळे	३
७७	शो. प. गेडाम	३
७८	रा. तु. निमकार	३
७९	भा. ब. कांडलकर	३
८०	वा. हृ. कांडलकर	३
८१	मो. शं. रामटेके	३
८२	एम. बी. मानेकार	२
८३	कृ. आ. कनिरे	३
८४	कु. आशा मा. पवार	२
८५	कु. इंदिरा पं. चव्हाण	२
८६	हिं. वि. पवार	२
८७	पं. का. जाधव	२
८९	प्र. रा. सुरटकर	३
९०	गो. प. सुरटकार	३
९१	गो. रा. म्हस्के	३
९२	दे. भु. पाटील	२
९३	दे. ग. मेश्राम	३
९४	कु. लीला वा. सांगोळे	३
९५	कु. शकुंतला शं. कडू	३
९६	नि. ल. गवई	३
९७	बा. वा. गावंडे	३
९८	कु. कृष्णी न. गायकवाड	२
९९	कु. विमल वा. श्रीवास्तव	२
१००	म. सं. मानकर	३
१०१	वा. न. वानखडे	३
१०२	ज. गो. गोतमारे	३
१०३	व. तु. चोपडे	३
१०४	रा. भ. उकंडे	३
१०५	भी. शं. कडवे	३
१०६	म. कृ. बंजारी	३
१०७	व. म. रणनवरे	३
१०८	कु. विमल बा. मोडघरे	२
१०९	कु. मंदाकिनी ना. ठाकरे	२
११०	कु. प्रमिला अं. यावले	३
१११	कु. कमल मो. देशमुख	३
११२	कु. कमल तु. वानखडे	३
११३	कु. मंदा गु. देशमुख	२
११४	सु. नी. विघळे	३
११५	ज्ञा. रा. पाथरे	२
११६	भी. गं. भोसले	३
११७	चं. ज. बडगे	२
११९	सु. ना. ठाकरे	३
१२०	दे. रं. गोंढाणे	३

क्रमांक	नाव	श्रेणी
१२१	द. गें. तांडील	३
१२३	प्र. शा. अईक	३
१२४	सु. मो. देशमुख	२
१२५	ह. ग. देशमुख	२
१२६	व. सु. देशमुख	२
१२८	कु. इंदु य. शिनकर	३
१२९	कु. लीला दौ. पाटणकर	३
१३१	दि. न. ठाकरे	३
१३२	ना. न. लाडे	३
१३३	द. रु. अढाऊ	३
१३४	ना. ल. तागडे	३
१३५	दि. ल. उज्जनकर	३
१३६	शं. रा. विचनकर	३
१४०	हि. शि. ताकोद	३
१४२	वि. सो. कोलवते	३
१४३	प्र. रा. महाजन	२

क्रमांक	नांव	श्रेणी
१४४	र. का. वापट	३
१४६	बा. शि. चिमणकर	३
१५४	अ. रा. बनगीनवार	३
१५५	म. ग. वट्टावार	३
१५७	उ. तु. जोगले	३
१५८	ज. मु. खनगई	३
१५९	पु. मा. भगत	२
१६०	गो. बा. हाते	३
१६१	दाऊदखाँ सरफराजखाँ	३
१६४	कु. निर्मला ना. मानकर	३
१६५	कु. लता तु. निबार्टे	३
१६६	कु. वनमाला व. चिद्दरवार	३
१६८	कु. विजया या. नालमवार	३
१६९	कु. मालन मा. बगाटे	३
१७०	कु. पंचफुला तु. भुरके	३

मराठी प्रवेश

क्रमांक	नाव	श्रेणी
१	वि. आ. कोळी	२
२	आ. श्री. आलासे	३
३	श्या. शं. कुळकर्णी	३
४	घ. रा. दत्तवाडे	२
५	कु. कुंदा मा. भट्टलवार	१
७	कु. प्रभा मा. नामपेल्लीवार	१
८	कु. अरुणा स. कायरकर	३
९	मु. गो. भट्ट	१
१०	चिं. उ. पाठक	२
११	ल. ये. मासमवार	२
१२	न. वा. गुप्ता	२
१३	द. चं. सितुत	२
१४	मं. फ. नगराळे	२

क्रमांक	नाव	श्रेणी
१५	अ. दे. भाले	१
१६	उमद्राणखाँ अहमदखाँ	१
१७	द. श्र. पेंढारकर	१
१८	वा. रे. कुळकर्णी	३
२१	का. कृ. वैराळे	२
२३	कृ. ना. देशमुख	२
२४	अं. रा. अगरवाले	२
२५	उ. अ. आंबळकर	३
२८	भ. स. शेटे	३
३०	अ. तु. इंगळे	३
३१	अ. क. गायकवाड	३
३२	कु. शालिनी अ. आंबळकर	३

साभार पोंच

(१) **राष्ट्रघन**—(गो. से. अर्थ वाणिज्य विद्यालय सहकारिता अंक १९६०) प्रकाशक : प्रिन्सिपाल, गो. से. वाणिज्य विद्यालय, नागपूर. मूल्य नाही.

(२) **धर्मनिर्णय-मंडळाचा रौप्य महोत्सव वृत्तांत**—प्रकाशक : कार्यवाह, धर्म-निर्णय-मंडळ, लोणावळे. मूल्य नाही.

(३) **योगसंग्राम, शेखमहंमद बावाकृत**—संपादक : वा. सी. बेंद्रे, लेले यांचा बंगला; फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणे. प्रकाशक : पी. पी. एच. बुकस्टॉल, मुंबई ४.

(४) **श्रीशिवराजाभिषेक**—संपादक : वा. सी. बेंद्रे, प्रकाशक : पी. पी. एच. बुकस्टॉल, मुंबई ४. मूल्य ६ रुपये.

(५) **पाकळ्या**—संपादक : आत्माराम भोयर, प्रकाशक : अरुणोदय प्रकाशन, नागपूर. मूल्य ३ रुपये.

(६) **मराठी वाङ्मयाभिरुचीचे विहंगमावलोकन**—लेखक : प्रा. रा. श्री. जोग; पुणे विद्यापीठ, पुणे ७; प्रकाशक : व. ह. गोळे, कार्यवाह; मूल्य २-५० न. पै.

(७) **मराठी नाट्यकला आणि नाट्यवाङ्मय**—लेखक : प्रा. श्री. ना. बनहट्टी; प्रकाशक : व. ह. गोळे; किंमत २-५० न. पैसे.

(८) **क्षणाची सून**—(तीन अंकी नाटक) लेखक : मधु आष्टीकर; प्रकाशक : वीणा प्रकाशन, नागपूर; किंमत १॥ रुपया.

(९) **सावळा गोंधळ**—(प्रचंड विनोदी नाटक) लेखक : मधु आष्टीकर; प्रकाशक : बाबुराव भूगावकर; रविंद्र फोटो स्टुडिओ; जवाहर पथ, अमरावती; मूल्य दीड रुपया.

(१०) **"तीन इसम तेरा आणे"**—लेखक : प्रा. मधुकर आष्टीकर; प्रकाशक : वि. र. बाम, रामकृष्ण बुकडेपो, गिरगाव मुंबई ४; मूल्य एक रुपया बारा आणे.

(११) **"नाटक बसले"**—लेखक : प्रा. मधुकर आष्टीकर; प्रकाशक : नवल नाट्य प्रकाशन, अमरावती. मूल्य आठ आणे.

(१२) **"वैरी"**—लेखक : प्रा. मधुकर आष्टीकर; प्रकाशक : नवल वाङ्मय प्रकाशन, अमरावती; मूल्य दीड रुपया.

(१३) **"श्रीपरमहंस परशराम महाराज स्तोत्र"** रचियता—स. धा. पांडे, आराळा; मूल्य सहा आणे.

卐

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाची प्रकाशने

पुस्तके		रु. पैसे
★१ निबंध परिमल		२-२५
२ सुमन संचय		१-२५
*३ मराठी गद्य		१-५०
*४ अंमलदार (नाटक) पु. ल. देशपांडे		२-००
५ भारती (नाटक) नाना जोग	...	१-५०
६ हिंदी मराठी भाषा प्रवेशिका — मालती बाई श्रीखंडे		०-७५
७ कै. हरिभाऊ नेने यांचा संशोधन लेख संग्रह भाग २		३-००
८ The Vedasthana or The Ancient Home of the Indo-Aryans-(पूर्ण ग्रंथ, ले. कै. डॉ. तु. ज. केदार		३-००
९ ,, ,, ,,	(केवळ भाग ४)	१-५०
१० डॉ केदार यांचे चरित्र	—ले. ज रा. जोशी	५-००
११ नाट्यमहोत्सव विशेषांक		३-००

कै. गडकरी वाङ्मयावरील प्रबंध

१२ वाग्वैजयंतीचे पुनर्मूल्यन	—डॉ. मा. गो देशमुख	०-३१
१३ नाटककार गडकरी	—द रा. गोमकाळे	०-३१
१४ गोविंदाग्रज यांचा कवि या नात्याने विचार—कविभूषण	प्रा. अण्णासाहेब खापर्डे	०-५०
१५ गडकऱ्यांच्या नाटकांतील स्वगत	—प्रा. श्री. मा. कुळकर्णी	०-५०
१६ सतारीचे नव्हे ! एकतारीचे बोल	—द. वि. तेंडूलकर	०-५०
१७ गडकऱ्यांची खरी भूमिका	—प्रा. भ. श्री. पंडित	०-५०
१८ गडकऱ्यांची नाट्यशैली	—प्रा. रू. पा. पांजणकर	०-५०

१९ "युगवाणी मासिक" —वार्षिक वर्गणी रु. ५ (वि. सा. संघाचे मुखपत्र)

ह्या पुस्तकाचे विक्रीचे अधिकार नागपूर प्रकाशन, नागपूर यांचेकडे आहेत.

*ह्या पुस्तकांचे विक्रीचे अधिकार ठाकूर आणि कंपनी, नागपूर यांचेकडे आहेत. बाकीची सर्व पुस्तके वि सा. संघ, उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर १ ह्या पत्त्यावर मिळतील.

विदर्भ साहित्य संघ

नवीन सभासद होऊं इच्छिणारास सूचना

विदर्भ साहित्य संघाचे नवीन वर्ष १ एप्रिल १९६० पासून सुरू होत असून नवीन वर्षाकरिता सभासद नोंदणी सुरू झाली आहे. वयाची २१ वर्षे पूर्ण झालेल्या कोणत्याहि मराठीभाषीप्रेमी व्यक्तीला सभासद होता येते. नव्याने सभासद होणारांना आवेदनपत्र भरून द्यावे लागते. साधारण सभासदाची वार्षिक वर्गणी फक्त रु. तीन आहे. सभासदांना युगवाणीचे अंक विनामूल्य पाठविण्यात येतात. सभासदांचे वर्ग पुढीलप्रमाणे आहेत.

(अ) **उपकर्ते**—पाच हजार किंवा अधिक रुपये देणारे.
(आ) **आश्रयदाते**—एक हजार किंवा अधिक रुपये देणारे.
(इ) **सहाय्यक**—पाचशे किंवा अधिक रुपये देणारे.
(ई) **हितचिंतक**—अडीचशे किंवा अधिक रुपये देणारे.
(उ) **आजीव सभासद**—पन्नास किंवा अधिक रुपये देणारे.
(ऊ) **साधारण सभासद**—वार्षिक तीन रुपये देणारे.

मराठी भाषेबद्दल प्रेम असणाऱ्या जास्तीत जास्त व्यक्तींनी सभासद व्हावे. आवेदनपत्र व वर्गणी केंद्रीय कार्यालयाकडे किंवा अधिकृत कार्यकर्त्याकडे जमा करावी व पावती घ्यावी ही विनंती.

श्री. गो. काशीकर
सरचिटणीस, वि. सा. संघ, नागपूर

हें मासिक श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे, यांनी वि. सा. संघाकरिता नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर १ येथे मुद्रित करून संघ–कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, सीतावर्डी, नागपूर १ येथे प्रकाशित केलें.